रविवार, १९ डिसेंबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक १५२
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## पाकिस्तानातून आलेले चिनी बनावटीचे ड्रोन बीएसएफने पाडले



**नवी दिल्ली :** भारतीय सीमारेषेवरील पाकिस्तानच्या कुरापती अद्यापही थांबलेल्या नाहीत. कोणत्या ना कोणत्या प्रकारे त्यांचे घुसखोरी करण्याचे प्रयत्न सुरूच आहेत. याच पार्श्वभूमीवर पाकिस्तानला जगासमोर उघडे करणारी एक घटना घडली आहे. सीमा सुरक्षा दलाने शनिवारी (दि. १८) फिरोजपूर सेक्टरमध्ये पाकिस्तानमधून आलेले एक ड्रोन यशस्वीरीत्या पाडले. हे ड्रोन चिनी बनावटीचे असल्याचेही समोर आले आहे. भारतीय लष्कराला असा संशय आहे की हे ड्रोन हेरॉईन किंवा शस्त्रांची एखादी खेप भारतीय हद्दीत फेकून परत जात होते. दरम्यान, ड्रोन ताब्यात घेण्यात आल्यानंतर परिसरात शोधमोहीम सुरू करण्यात आली. पहिल्यांदाच पंजाबमध्ये पाकिस्तानी ड्रोन पाडण्यात आल्याची घटना घडली आहे.

अंतरंग
कारखान्यातील सिलिंडरच्या स्फोटाने खोपोली हादरली/२
अर्थविषयक घडामोडींचा वेध घेणारे सदर अर्थ प्रहर/४
केएल राहुल टीम इंडियाच्या उपकर्णधारपदी/६

# सहकार चळवळ पुढे नेणार

## केंद्रीय सहकारमंत्री अमित शाहांचे प्रतिपादन

**अहमदनगर : प्रतिनिधी**

सहकार क्षेत्राच्या चळवळीला आम्ही पुढे घेऊन जाऊ इच्छितो. त्यामुळे येणाऱ्या काळात या क्षेत्राला काहीही मदत लागली तर नरेंद्र मोदी सरकार ती देईल, असे आश्वासन केंद्रीय सहकारमंत्री अमित शाह यांनी शनिवारी (दि. १८) दिले. अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरानगर येथे आयोजित देशातील पहिल्या सहकार परिषदेत ते बोलत होते.

व्यासपीठावर रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, केंद्रीय अर्थराज्यमंत्री भागवत कराड, राज्य विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील, ज्येष्ठ नेते राधाकृष्ण विखे-पाटील, खासदार सुजय विखे-पाटील आदी उपस्थित होते.



या वेळी मंत्री अमित शाह यांनी आपली भूमिका मांडली.

अमित शाह यांनी म्हटले की, विठ्ठलराव विखे-पाटील यांनी दूरदृष्टीतून शेतकऱ्यांच्या विकासासाठी साखर कारखाना सुरू केला. हा कारखाना आजही सहकारी पद्धतीने सुरू आहे याचा मला आनंद वाटतो. कारण अनेक सहकारी साखर कारखाने खाजगी झाले आहेत. कमीत कमी एक साखर कारखाना जपून ठेवला आहे आणि तो व्यवस्थितपणे चालवत आहेत याचा मला खूप आनंद आहे.

स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षांनी मोदी सरकारने सहकार मंत्रालय स्थापन का केले असे विचारणाऱ्यांना उत्तर द्यायला मी आलोय, असे सांगत शाह म्हणाले की, देशातील सहकारी साखर कारखान्यांमधून एकूण ३१ टक्के साखरेचे उत्पन्न होते. हे देशात सर्वांना माहिती नाही. दुधाचे २० टक्के उत्पादन सहकार क्षेत्र करते. १३ टक्के गहू, २० टक्के तांदळाची खरेदी सहकार क्षेत्र करते. २५ टक्के खतांचे उत्पादन आणि वितरण दोन्ही सहकाराच्या माध्यमातून होते. येत्या काळात सहकारी नीती येईल. याद्वारे पुढील २५ वर्षे सहकारात प्राण फुंकण्याचे काम केले जाईल.

### 'सहकार चळवळ धोक्यात आल्याचे सांगणारेच खाजगी कारखान्यांचे मालक'

या वेळी विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सत्ताधाऱ्यांवर अप्रत्यक्ष शब्दांमध्ये निशाणा साधला. अनेक लोक सहकार चळवळ धोक्यात आहे असे सांगतात, पण असे लोकच खाजगी कारखाने काढून बसले आहेत आणि ते खाजगी कारखान्यांचे मालक आहेत. सहकाराचे कारखाने खाजगीत त्यांनी नेले आहेत आणि आता तेच शिकवतायत की सहकार चळवळ अडचणीत आहे, असे फडणवीस म्हणाले. माझा त्यांना सल्ला आहे की जर सहकार चळवळ अडचणीत आहे, तर तुम्ही त्या चळवळीला मदत करा, असेही त्यांनी नमूद केले.

## अनिल परबच गद्दार, राष्ट्रवादीच्या साथीने शिवसेना संपवण्याचा डाव

**मुंबई : प्रतिनिधी**



**रामदास कदमांचा गंभीर आरोप**

शिवसेना नेते रामदास कदम यांनी शनिवारी (दि. १८) पत्रकार परिषद घेऊन शिवसेनेचे मंत्री अनिल परब यांच्यावर जोरदार टीका केली. परब हे राष्ट्रवादीच्या साथीने शिवसेना संपवायला निघाले आहेत. तेच गद्दार असून रत्नागिरीतील शिवसेना ही राष्ट्रवादीच्या घशात घालण्याचा त्यांचा डाव असल्याचा गंभीर आरोप कदम यांनी या वेळी केला.

कदम म्हणाले की, माझ्याविरोधात माध्यमांमधून उलटसुलट बातम्या चालवण्यात आल्या. मला आरोपीच्या पिंजऱ्यामध्ये उभे केले आहे. म्हणूनच माझी बाजू मांडण्यासाठी मी समोर आलो आहे. जी व्हिडीओ क्लिप व्हायरल झाली होती त्यामध्ये मी शिवसेनेच्या बाबतीत काहीही बोललेलो नाही. मी बाळासाहेबांची शपथ घेऊन सांगतो की, मी किरीट सोमय्या यांच्यासोबत बोललो नाही. त्यांच्यासोबत कुठलीही चर्चा झालेली नाही. पक्षाला हानी पोहचेल अशी कुठलीही गोष्ट माझ्याकडून घडलेली नाही. मी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंना पत्र देऊन खुलासा केला होता. दोन नेत्यांमधील वाद चव्हाट्यावर येऊ नयेत म्हणून मी काही पथ्य कालपर्यंत पाळली होती, मात्र अन्याय किती सहन करायचा यालादेखील मर्यादा असतात.

अनिल परब रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. मी ठामपणे सांगतो फक्त १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीला ते जिल्ह्यामध्ये येतात. बाकी संपूर्ण जिल्हा त्यांनी वाऱ्यावर सोडून दिला आहे. परबांचा जिल्ह्यासोबत कुठलाही संपर्क नाही. तालुका प्रमुखाचे नावही त्यांना माहिती नाही. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये प्रचंड असंतोष आहे, असा दावा कदम यांनी केला.

मी मरेपर्यंत शिवसेना सोडणार नाही, पण मुले निर्णय घ्यायला मोकळी आहेत. शिवसेनेतून माझी हकालपट्टी केली तरी मी शिवसैनिक म्हणून जगेन, असेही कदम यांनी या वेळी स्पष्ट केले.

## कोरोना पॉझिटिव्ह विद्यार्थी आढळलेली नवी मुंबईतील शाळा सात दिवस राहणार बंद

**नवी मुंबई : बातमीदार**

कोरोनाचा प्रादूर्भाव कमी झाल्यामुळे शालेय शिक्षण विभागाने राज्यातील शाळा सुरु करण्याचा निर्णय घेतला, मात्र शाळा सुरू होऊन काही दिवस उलटत नाही तोच नवी मुंबईतील घणसोली येथील शेतकरी शिक्षण संस्थेची शाळा सात दिवसांसाठी बंद ठेवण्याचा निर्णय पालिका आयुक्तांना घ्यावा लागला आहे.

या शाळेत अकरावीमध्ये शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याचे पालक कतारमधून आले होते. त्यांची कोरोना टेस्ट केल्यावर अहवाल पॉझिटिव्ह आला. यामुळे वर्गातील इतरांची चाचणी केली असता १६ जण पॉझिटिव्ह आढळले. त्यात आणखी दोघाची भर पडलीय.

(संबंधित वृत्त पान ३ वर..)

## विकासासाठी भाजपला सत्ता द्या -आमदार रवींद्र चव्हाण

### पालीत प्रचार रॅली व सभा

**पाली : प्रतिनिधी**

आपल्या भारत देशाला सशक्त बनवायचे असेल, तर सशक्त भाजप बनवावा लागेल. या दृष्टीने परिसराचा विकास साधण्यासाठी ग्रामपंचायत, नगरपंचायत ते संसद सर्वत्र भाजप सत्तास्थानी येणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन रायगड जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा भाजप प्रदेश सरचिटणीस आमदार रवींद्र चव्हाण यांनी शनिवारी (दि. १८) येथे केले. महाकाली मंदिरात झालेल्या जाहीर सभेत ते बोलत होते.

पाली नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक भाजप स्वतंत्रपणे लढत आहे. १३ प्रभागांत भाजपचे शिलेदार निवडणूक रिंगणात आहेत. या उमेदवारांच्या प्रचारार्थ आमदार रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत बल्लाळेश्वराचे



(छाया : धम्मशील सावंत)

दर्शन घेऊन रॅली काढण्यात आली. या रॅलीला प्रतिसाद लाभला. यानंतर झालेल्या सभेत आमदार चव्हाण यांनी आपल्या विस्तृत भाषणात महाविकास आघाडीवर टीका केली.

पाली शहराला शुद्ध पाणीपुरवठा योजनेसाठी १३ कोटींची योजना मंजूर झाली होती, मात्र ही योजना महाविकास आघाडीच्या नतद्रष्ट सरकारने होऊ दिली नाही, असा आरोप आमदार रवींद्र चव्हाण यांनी केला. या अष्टविनायक तीर्थक्षेत्राचा विकास, पर्यटनवृद्धी, स्वच्छता, शुद्ध व मुबलक पाणीपुरवठा, दर्जेदार रस्ते यासाठी भाजपच्या हाती सत्ता द्या. संकल्पनाम्यातील प्रत्येक विकासकाम कृतीत आणू, अशी ग्वाही आमदार चव्हाण यांनी या वेळी दिली. (पान २ वर..)

## निवडक

### पंतप्रधान मोदींच्या हस्ते गंगा एक्स्प्रेस वेचे भूमिपूजन

**लखनऊ :** पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शनिवारी (दि. १८) गंगा एक्स्प्रेस वेची पायाभरणी केली. हा एक्स्प्रेस वे ५९४ किमी लांबीचा आणि सहा लेनचा असेल. या प्रकल्पासाठी ३६,२०० कोटी रुपये गुंतवण्यात येणार आहेत. या वेळी पंतप्रधानांनी यूपी+योगी म्हणजेच खूपच उपयोगी असल्याचे म्हटले.

### डेल्टापेक्षा ओमायक्रॉनचा वेग जास्त, रुग्णसंख्या दुप्पट

**नवी दिल्ली :** ओमायक्रॉन विषाणूची लागण होण्याचा दर हा डेल्टापेक्षाही वेगवान असून अधिक लोकसंख्या असलेल्या आणि सामूहिक संसर्ग झालेल्या देशांत याची झपाट्याने वाढ होत आहे. सामूहिक संसर्ग झालेल्या देशांमध्ये याची लागण होण्याची संख्या दीड ते तीन दिवसांत दुपटीने वाढली आहे, अशी माहिती जागतिक आरोग्य संघटनेने शनिवारी (दि. १८) दिली.



**पनवेल : देवसागर साधक समाज (इंचगिरी संप्रदाय) संचलित शिवाजी नगर येथील श्री. स. स. बाळकृष्ण महाराज आध्यात्मिक ज्ञानमंदिरातील अखंड हरिनाम सप्ताहाची दत्त जयंती दिनी सांगता झाली. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, पं. स. सदस्य रत्नप्रभा घरत, भूपेंद्र पाटील, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील आदींनी तेथे जाऊन दर्शन घेतले. (अधिक छायाचित्रे पान ६ वर..)**



## टीईटी पेपरफुटीचे धागेदोरे जालन्यापर्यंत

### प्रा. सुनील कायंदे यांच्या घरी धाड

**जालना :** शिक्षक पात्रता परीक्षेचे (टीईटी) पेपरफुटी प्रकरणाचे धागेदोरे आता जालना जिल्ह्यापर्यंत पोहचले असून पुणे गुन्हे शाखेचे पथक शनिवारी (दि. १८) प्रा. सुनील कायंदे यांच्या घरी धडकले. त्यामुळे जालना जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. म्हाडाच्या पेपरफुटी प्रकरणाचा पर्दाफाश झाल्यानंतर टीईटी पेपरफुटीचे प्रकरण पुढे आले आहे. या प्रकरणी पुणे पोलिसांच्या सायबर गुन्हे शाखेने गुरुवारी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे अध्यक्ष तुकाराम सुपे यांना त्यांच्या पिंपरी चिंचवड येथील घरातून अटक केली होती.

पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी



पनवेल महानगरपालिका हद्दीत
रविवार, दि. १९ डिसेंबर २०२१ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
२. जुने ग्रामीण रुग्णालय, कोळीवाडा-उरण नाका, पनवेल
३. यूपीएचसी-३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, से.२
८. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
९. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
१०. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
११. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
१२. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
१३. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली


कोवॅक्सिन

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
२. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५, खारघर.

## सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते आरडीपीएलचे उद्घाटन





**रसायनी : रामप्रहर वृत्त**

रायगड डॉक्टर्स लेदर क्रिकेट असोसिएशनच्या वतीने मोहोपाडा येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटीस मार्केट्स क्रिकेट ग्राऊंडवर रायगड डॉक्टर प्रीमियर लीगचे (आरडीपीएल) आयोजन करण्यात आले आहे. या दोन दिवसीय क्रिकेट लीगचे उद्घाटन पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि. १८) झाले.

या वेळी रायगड डॉक्टर्स लेदर क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. राजेश शिंदे, उपाध्यक्ष डॉ. घनश्याम पाटील, डॉ. सचिन नाईक, सचिव चंद्रकांत शिंदे, खजिनदार डॉ. संतोष जाधव, सहसचिव राजाराम हुलवान, सहखजिनदार डॉ. प्रशांत जगताप आदी उपस्थित होते.

कोविड काळात डॉक्टरांनी खूप काम केले. त्यांचीही फिटनेस कायम राहावी आणि त्यांना काही काळ विरंगुळा मिळावा यासाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेत सर्व डॉक्टरांची चार संघांत विभागणी करण्यात आली असून, या संघांमध्ये सामने खेळले जात आहेत.

## राम प्रहर अर्थसाक्षर प्रश्नमंजुषा

आपल्या 'दैनिक राम प्रहर'मध्ये दर रविवारी अर्थ प्रहर सदर प्रकाशित होते. या सदरातून वाचकांना अर्थविषयक माहिती देण्यात येते. ही माहिती 'राम प्रहर'च्या वाचकांसाठी लाभदायक ठरत असते. याच सदरात दर रविवारी आता वाचकांसाठी प्रश्नमंजुषा सुरू करीत आहोत.

'अर्थसाक्षर' या शीर्षकाखाली येत्या रविवारी, दि. २६ डिसेंबर २०२१पासून सुरू होणाऱ्या या प्रश्नमंजुषेमध्ये वाचकांना तीन प्रश्न विचारण्यात येतील. या प्रत्येक प्रश्नासोबत चार पर्यायी उत्तरे दिली जातील. त्यातील योग्य उत्तर वाचकांनी निवडायचे आहे. निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअ‍ॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

या तिन्ही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तिन्ही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील. तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा.

# कंपनीतील स्फोटाने खोपोली हादरली

## ■ सुदैवाने जीवितहानी नाही, मात्र नागरिकांना जाणवला त्रास

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिका हद्दीतील महिंद्रा सानियो लिमिटेड या स्टील उत्पादन करणाऱ्या कारखान्यात ऑक्सिजन साठवणूक करणाऱ्या टाकीचा अचानक स्फोट झाला. या स्फोटाने परिसरात खोपोली शहरात काही क्षणापुरते हादरे बसले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र स्फोटामुळे उधळलेल्या पावडरचा त्रास जाणवल्याचे परिसरातील नागरिकांनी सांगितले.

वासरंग गावच्या हद्दीतील स्टीलची निर्मिती करणाऱ्या महिंद्र सानियो लिमिटेड या कारखान्याच्या एसएमएस डिपार्टमेंटचा काही अंतरावरील ऑक्सिजन साठवणूक करणाऱ्या टाकीमध्ये सायंकाळच्या सुमारास अचानक स्पोट झाला. या स्फोटाने वासरंग गावासह, खोपोली शहरही हदरले. त्यामुळे मोठ्या प्रमाणात कंपनी प्रवेशद्वारावर नागरिकांनी गर्दी केली होती. परिस्थितीचे गांभीर्य पाहता याच वेळेस अग्निशामक दलाला पाचारण करण्यात आले होते. टाकीतील स्फोटाने कंपनीजवळच्या कॉलनीला जाणाऱ्या रस्त्यावर पांढरा रंग पसरला होता.



मिळालेल्या माहितीनुसार, सुदैवाने यात कोणीही जखमी नसल्याचे वृत्त आहे, मात्र व्यवस्थापनाततर्फे कुणीही माहिती देण्यात उपलब्ध नव्हते. त्यामुळे काही काळ तणावाचे व भीतीचे वातावरण पसरले होते. परिस्थितीचे गांभीर्य पाहता विद्युत पुरवठा तत्काळ बंद करण्यात आला होता. तासाभरानंतर सुरू करण्यात आला. स्फोटाच्या हादऱ्याने परिसरातील घरातील भांडी पडण्याचे, तसेच काचा तडकण्याचे प्रकार ऐकावयास मिळाले. परिस्थिती नियंत्रणाखाली असल्याचे सांगण्यात येत आहे.



### सफेद भुकटीचे हवेत लोट

*दरम्यान, या कंपनीत झालेल्या या स्फोटाने परिसरात सफेद भुकटीचे हवेत लोट पसरले. वासरंग सुभाष नगर व महिंद्रा रहिवासी परिसरात प्रचंड हादरा बसला. रहिवासी भूकंप झाल्याच्या भीतीने घराबाहेर पडले. तर परिसरात प्रचंड तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. सुभाष नगर मार्गावर सफेद भुकटी पावडर पसरल्याने मार्ग सफेद झाले होते. घसा घवघवणे, दम लागणे अशी लक्षणे जाणवत असल्याचे वासरंग गावातील रहिवाशांनी सांगितले.*

# विरोधी पक्षनेते दरेकर आज रायगड दौऱ्यावर

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर रविवारी (दि. १९) रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात दरेकर नगरपंचायत निवडणुकीच्या प्रचारात सहभागी होणार आहेत.



रायगड जिल्ह्यात नगरपंचायत निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली आहे. यामध्ये एकूण सहा नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. या निवडणुकीसाठी मंगळवारी (दि. २१) मतदान होणार असून मतमोजणी बुधवारी (दि. २२) होणार आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर रविवारी रायगडचा दौरा करणार आहेत.

या दौऱ्यामध्ये दरेकर हे सकाळी १० वाजता पोलादपूर शहर येथे नगरपंचायत निवडणुकीच्या प्रचार फेरीत सहभागी होणार आहेत. त्यानंतर दुपारी ३ वाजता तळा नगरपंचायत निवडणुकीच्या प्रचारार्थ बळीचा नाका, तळा येथे आयोजित प्रचारसभेत उपस्थित राहणार आहेत. या वेळी भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते हजर असतील.

नगरपंचायत निवडणुकीच्या मतदानासाठी कमी अवधी राहिला असल्याने प्रचाराला वेग आला आहे. त्यामुळे ऐन थंडीत राजकीय वातावरण तापले असून दरेकर काय बोलणार याकडे लक्ष लागले आहे.

# जासई हायस्कूलमध्ये अल्पसंख्याक हक्क दिवस

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेचे उरण तालुक्यातील जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेजमध्ये १८ डिसेंबर हा अल्पसंख्याक हक्क दिवस म्हणून साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील हे होते. त्यांनी अल्पसंख्याक नागरिकांना त्यांची संस्कृती, भाषा, धर्म आणि परंपरा यांचे संवर्धन करता यावे म्हणून राज्य घटनेने जे अधिकार दिले आहेत त्यांची माहिती आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांना दिली.




या वेळी विद्यालयाचे प्राचार्य व रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर अरुण घाग यांनीही मनोगतात विद्यार्थ्यांना अल्पसंख्याकांना त्यांच्या घटनात्मक आणि कायदेशीर हक्कांबाबत जाणीव करून दिली.

रयत सेवक संघाचे समन्वयक एन. एच. शेख व नेहा हुदार यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यालयाचे पर्यवेक्षक आर. एस. साळुंखे व सर्व सेवक वर्ग आणि विद्यार्थी, तसेच यशवंत घरत, सुभाष घरत, बाळाशेठ पाटील इत्यादी शिक्षणप्रेमी नागरिक उपस्थित होते.

या अल्पसंख्याक हक्क दिवसानिमित्ताने विद्यालयात निबंध स्पर्धेचे आयोजन केले होते, तसेच यशस्वी विद्यार्थ्यांचे कार्यक्रमाचे अध्यक्ष सुरेश पाटील यांच्या हस्ते अभिनंदन करण्यात आले.

# अंधेरी कामगार राज्य विमा रुग्णालय त्वरित सुरू करा

## भारतीय मजदूर संघाची मागणी

**मुंबई : प्रतिनिधी**

अंधेरीतील कामगार राज्य विमा रुग्णालयाला १७ डिसेंबर २०१८ आग लागली होती. या आगीत १४ रुग्णांचा मृत्यू झाला होता. गेल्या तीन वर्षांपासून हे रुग्णालय बंद असून ते त्वरित सुरू करावे, अशी मागणी भारतीय मजदूर संघाने केली आहे. याबाबतचे निवेदन शिष्टमंडळाद्वारे कामगार मंत्री भूपेंद्र यादव यांना रिजनल डायरेक्टर मुंबई यांच्याद्वारे देण्यात आले.

रुग्णालय बंद असल्यामुळे कामगारांना अनंत अडचणींचा सामना करावा लागत आहे. आधीच कामगार राज्य विमा योजनेची सेवा निकृष्ट दर्जाची असल्याबद्दल कामगारांच्या असंख्य तक्रारी आहेत. त्यात हे रुग्णालय तीन वर्षे बंद असल्याने कामगारांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. गेल्या ३ वर्षात हे रुग्णालय सुरू करू न शकल्याने मंडळाची निष्क्रियता स्पष्ट झाली तरी हे रुग्णालय लवकरात लवकर सुरू करावे आणि या रुग्णालयातील आगीबाबत केलेल्या चौकशीचा अहवाल व त्यावर केलेली कार्यवाहीचा तपशील लवकरात लवकर जाहीर करावा, अशी मागणी भारतीय मजदूर संघाने केली आहे.



निवेदन देताना भारतीय मजदूर संघ, महाराष्ट्र प्रदेशाचे अध्यक्ष ॲड. अनिल दुमणे, मुंबईचे अध्यक्ष बापू दडस, संदीप कदम, ए. टी. सावंत व उत्कर्षा बिर्जे आदी उपस्थित होते.

# पनवेल, उरण, नवी मुंबईत दत्त जयंती उत्साहात; भाविकांनी घेतले दर्शन



**पनवेल : वार्ताहर**

पनवेलच्या गावदेवीपाडा येथे श्री स्वामी समर्थ मठात दत्तजयंती नियमांचे पालन करत मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. त्याचबरोबर मान्यवरांच्या हस्ते श्री स्वामी समर्थ आरती संग्रह आणि स्वामीच्या पोथीचे प्रकाशन करण्यात आले.

या वेळी श्री स्वामी समर्थ मठाधिपती सुधाकर भाऊ घरत, नगरसेवक अजय बहिरा, पनवेल महापालिकेचे उपायुक्त विठ्ठल डाके, सहाय्यक पोलीस निरीक्षक शरद ढोले, पोलीस शिपाई धनवट, संवेदना प्रकाशन पुणेचे नितीन हिरवे, पत्रकार संजय कदम, प्रशांत शेडगे आणि असंख्य स्वामी भक्त उपस्थित होते. दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन श्री स्वामी समर्थ मठात करण्यात आले होते. काकड आरती, नित्यनैमितिक पूजा प्रसाद, लघुरूद्र, दत्तजन्म सोहळा, दत्तगायत्री होम हवन, श्री स्वामी समर्थ महिला मंडळ यांची भजने त्यानंतर महाआरती आणि महादेव बुवा शहाबाजकर आणि मंडळी यांची भजने झाली. उत्सवात मोठ्या प्रमाणात स्वामीभक्तांनी सहभाग घेतल्याचे मठाधिपती सुधाकर घरत यांनी सांगितले.



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा व शिवनगर ग्रामस्थांचे बाजारपेठेत असणाऱ्या दत्त मंदिरात दत्त जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन साध्या पद्धतीने करण्यात आले होते.

पहाटे काकड आरती, सकाळी दत्तमूर्ती अभिषेक करण्यात आले. या वेळी झालेल्या पूजेचा मान पत्रकार राकेश खराडे व रसिका खराडे यांना मिळाला. यानंतर ग्रामस्थांच्या वतीने ज्ञानेश्वरी पारायण, संगीत भजनाचा कार्यक्रम झाला. किशोर लोहार यांचे तबलावादक भजन, श्री दत्त जन्माचे कीर्तन हभप वामन महाराज भोईर यांनी केले. हरिपाठ आणि दतगुरूंच्या पालखीची मिरवणूक श्रीदत्त मंदिरातून मोहोपाडा गाव तेथून पुन्हा श्रीदत्त मंदिर अशी काढण्यात आली.

या मिरवणुकीत लहानथोर, मोहोपाडा ग्रामस्थ, महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, मोहोपाडा येथील श्री दत्त मंदिर बाजारपेठेत असल्याने दर्शनासाठी भाविकांची रांग लागल्याचे चित्र पाहावयास मिळाले. या वेळी शासकीय नियमांचे पालनही करण्यात आल्याचे दिसून आले.

**उरण : वार्ताहर**

दत्त जयंतीनिमित्त उरण तालुक्याची यात्रा दरवर्षी असते. कोरोनाचा प्रादूर्भाव होवू नये याकरिता दत्त जयंती साधेपणाने साजरी करण्यात आली. उरण शहरातील देऊळवाडी येथे दत्त मंदिरात दर्शनसाठी आलेल्या भक्तांची चांगल्या प्रकारची सोय करण्यात आली. आमदार महेश बालदी मित्र मंडळ व देऊळवाडी ग्रामस्थ यांच्या वतीने भक्तांना प्रसाद (पार्सल) व एक पाण्याची बाटली देण्यात आली.



आमदार महेश बालदी, आमदार महेश बालदी मित्र मंडळाचे सर्व सदस्य, नगराध्यक्ष सायली म्हात्रे, उपनगराध्यक्ष जयविन कोळी, भाजप तालुकाध्यक्ष तथा नगरसेवक रवी भोईर, शहराध्यक्ष तथा नगरसेवक कौशिक शाह, नगरसेवक राजेश ठाकूर, धनंजय कडवे, नगरसेविका प्रियंका पाटील, शहर युवा अध्यक्ष निलेश पाटील, रोहित पाटील, हस्तीमल मेहता, हितेश शाह, मनन पटेल, अजित भिंडे, देऊळवाडी ग्रामस्त मंडळचे अध्यक्ष निरंजन नार्वेकर, सुहास जुवेकर, विपुल झुझम, तुषार म्हात्रे, सतीश पुजारी, ओमकार बैरागी, सुनील बैरागी, अभिजित पाटील, दिनेश ठक्कर यांचे सहकार्य लाभले.

केगाव ग्रामपंचायत हद्दीतील विनायक-कोळीवाडा येथील जगदिश कोळी यांचे एक मुखी दत्त मंदिर, मोरा कोळीवाडा बालई गावातील दत्त मंदिर येथे, बोरी नाका येथील परेश तेरडे आदी ठिकाणी दत्त जयंती सोहळा साजरा करण्यात आला.



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवयुग पंचपरमेश्वर चॅरिटेबल ट्रस्ट आयोजित नेरूळ सेक्टर १० मधील जागृत श्री पंचपरमेश्वर मंदिराचा २४वा वर्धापन दिन आणि दत्त जयंती उत्सव मोठ्या धार्मिक वातावरणात साजरा करण्यात आला.

या उत्सवात काकड आरती, हरिपाठ, महाभिषेक पालखी सोहळा झाला. या वेळी भाविकांनी शिस्तीने दत्तगुरूंचे दर्शन घेतले. पंचपरमेश्वर महिला भजन मंडळाचे सुश्राव्य भजनही झाले. सोशल डिस्टन्सिंगचे पालन करून धार्मिक उत्सव अध्यक्ष नवनाथ चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली झाला.

पान १ वरून

## विकासासाठी भाजपला सत्ता द्या -आमदार रवींद्र चव्हाण

भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष ॲड. महेश मोहिते यांनी पालीच्या सर्वांगीण व शाश्वत विकासासाठी भाजपच्या हाती सत्ता द्या, पाली शहराचा कायापालट करून दाखवू, असे आश्वासित केले.

संघटन सरचिटणीस सतीश धारप म्हणाले की, महाविकास आघाडीचे विश्वासघाती सरकार सत्तेत आले आणि पेयजल योजना धुळीस मिळाली. पाली शहराला शुद्ध पाणीपुरवठ्याची योजना भाजपच्या माध्यमातूनच मार्गी लागणार आहे.

जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा यांनी पाली नगरपंचायतीत भाजपचे कमळ फुलणार व पालीचा चेहरामोहरा भाजपच्या माध्यमातूनच बदलणार, असा विश्वास व्यक्त केला.

या वेळी संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष हेमा मानकर, भाजप सुधागड तालुका अध्यक्ष दादा घोसाळकर, कर्जतचे उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, आलाप मेहता, भाजप सुधागड तालुका सरचिटणीस सागर मोरे, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष रोहन दगडे, केतन देसाई, उमेश मढवी, माजी तालुकाध्यक्ष राजेंद्र गांधी, अजय खंडागळे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.





# आजिवलीतील तरुणाने केले आई-वडिलांचे स्वप्न साकार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वप्नांना पंख असतात असे म्हणतात, पण त्या पंखांमध्ये मेहनतीचेही बळ असते. अशाच एका तरुणाने जिद्दीने, चिकाटीने आणि मेहनतीने आपल्या स्वप्नपंखांमुळे यशस्वी भरारी घेतली आहे. उमेश मगर या तरुणाने आपल्या आई-वडिलांना हेलिकॉप्टरमधून फिरवायचे स्वप्न स्वतःच्या वाढदिवसानिमित्त नुकतेच साकार केले.


पनवेल तालुक्यातील आजिवली गावातील हा मुलगा गवंडी कामगारांच्या कुटुंबात जन्मला, आई-वडील दोघेही गवंडी. आई-वडिलांनी त्याला गरीब परिस्थितीत वाढवला, शिकवला त्यांच्या कष्टाचे आज चीज होताना दिसत आहे. त्यांच्या कष्टाळू चेहऱ्यावर आज सुखाचे स्मितहास्य ओसंडून वाहताना दिसतेय. त्यांच्यासाठी आजचा दिवस मुलाच्या यशामुळे खऱ्या अर्थाने सोन्याचा ठरला आहे.

उमेश मगरच्या वाढदिवसाला पनवेल तालुका भाजपचे सरचिटणीस राजेंद्र पाटील, पंचायत समितीचे माजी उपसभापती वसंत काठावले, कोन ग्रामपंचायतीचे सरपंच निलेश म्हात्रे, पनवेल तालुका ओबीसी मोर्चा अध्यक्ष आप्पा भागित, उपसरपंच महेंद्र गोजे, ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर भागित, जगन्नाथ सारडेकर, महेश माळी, माजी सदस्य संतोष पाटील यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

# आयएनएसच्या कार्यकारिणीवर विलास मराठे बिनविरोध

**मुंबई : प्रतिनिधी**

देशातील वृत्तपत्र मालकांची सर्वोच्च संस्था इंडियन न्यूज पेपर सोसायटी नवी दिल्लीच्या (आयएनएस) कार्यकारिणीत दै. हिंदुस्थान (अमरावती) चे प्रबंध संपादक विलास अ. मराठे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. संघटनेच्या अध्यक्षपदी इकॉनॉमिक टाईम्सचे मोहित जैन यांची निवड करण्यात आली. मराठे यांची सलग १९व्यांदा निवड झाली आहे.



आयएनएसची वार्षिक सर्वसाधारण सभेत कार्यकारिणी जाहीर झाली. यात मराठे यांची कार्यकारी सदस्य म्हणून निवड झाली. कार्यकारिणीत दै. लोकमत वृत्तपत्र समूहाचे अध्यक्ष माजी खासदार विजय दर्डा, सकाळ वृत्तपत्र समूहाचे प्रमुख प्रतापराव पवार, बेळगाव तरुण भारतचे किरण ठाकूर व लोकमतचे करण दर्डा यांचा समावेश आहे. दरम्यान, मराठे यांनी राज्य शासनाच्या राज्य अधिस्वीकृती समितीचे सदस्यपद भूषविले आहे. ते विदर्भ साहित्य संघाच्या शाखा अमरावतीचे अध्यक्ष आहेत.

## निवडक

### दुचाकी नोंदणीसाठी नवीन मालिका

**नवी मुंबई :** पनवेलमधील प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये दुचाकी मोटार वाहनांच्या नवीन नोंदणीसाठी एमएच ४६ सीडी ही नवीन मालिका लवकरच सुरू होत आहे. ज्यांना नवीन वाहनासाठी एमएच ४६ सीडी या मालिकेतील महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५७अ अन्वये आकर्षक/अनाकर्षक नोंदणी क्रमांक राखीव करावयाचे असतील त्यांनी या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत संपर्क साधण्यात यावा, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी अभय देशपांडे यांनी पनवेल कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील उरण, पनवेल, कर्जत व खालापूर तालुक्यातील नागरिकांना केले आहे. एकाच नोंदणी क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्जदारांनी अर्ज केल्यास तरतुदीनुसार नोंदणी क्रमांकासाठी जाहीर लिलाव केला जाईल, असेही प्रसिद्धीपत्राद्वारे कळविले आहे.

### डॉ. बाळासाहेब खडबडे यांची निवड

**पनवेल :** पनवेलसह, नवी मुंबई, रायगड परिसरामध्ये कामोठे येथील प्रसिद्ध डॉ. बाळासाहेब खडबडे यांच्या यशोदा हॉस्पिटलमधील फर्टिलिटी व आयव्हीएफ सेंटरला महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून वंध्यत्व निवारण अभ्यासक्रमाच्या फेलोशिपसाठी मान्यता मिळाली आहे. डॉ. बाळासाहेब खडबडे (यशोदा हॉस्पिटल) हे वंध्यत्व निवारणासाठी प्रसिद्ध आहेत.



पनवेलसह संपूर्ण रायगड परिसरातील ज्या स्त्रियांना मूल होत नाही, अशा अनेक स्त्रियांचे आयव्हीएफच्या माध्यमातून कृत्रिम गर्भधारणेद्वारे डॉक्टरांच्या यशस्वी उपचार पद्धतीमुळे वंध्यत्व निवारण झालेले आहे. डॉक्टर बाळासाहेब खडबडे हे वैद्यकीय क्षेत्रातील एक नावाजलेले नाव आहे. डॉक्टर बाळासाहेब खडबडे यांनी वैद्यकीय क्षेत्रात आजपर्यंत अतिशय उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे.

### नवी मुंबईत सुशोभीकरणास वेग

**नवी मुंबई :** सीवूड्स येथील भाजपचे माजी नगरसेवक विशाल डोळस यांनी आयुक्त बांगर यांची भेट घेतली. या भेटीत सीवूड्स परिसरातील लखानी, पाम व्यू सोसायटी येथील सर्कल, गायमुख पोलीस चौकीजवळील सर्कल, अक्षरजवळील सर्कल या ठिकाणी सुशोभीकरण करण्याची मागणी करण्यात आली. याशिवाय सेक्टर ४८, ५० येथील फुटपाथवर स्टॅम्प काँक्रीट करणे, सेक्टर ५० येथील सीबीएसई शाळेशेजारील मोकळ्या जागेत शालेय मुलांसाठी आर्टिफिशियल टर्फ तयार करणे इत्यादी कामे करण्यासाठी विनंती करण्यात आली. त्यानुसार आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यास ही प्रस्तावित कामे त्वरित करण्याच्या सूचना दिल्या. माजी नगरसेवक डोळस यांच्या मागणीला यश आले असून, याविषयी अधिकाऱ्यांची बैठकदेखील झाली. सीवूड्स परिसरातील सुशोभीकरणास वेग येणार आहे.

### आपटा येथे आज विकासकामांचे भूमिपूजन

**रसायनी :** आपटा ग्रामपंचायत नवीन इमारत, आपटा कोळीवाडा संरक्षण भिंत व आपटा मोहल्ला येथे दर्गा साकव ही कामे करण्यात येणार आहेत. या कामांचा भूमिपूजन सोहळा रविवारी (दि. १९) सकाळी ११ वाजता आपटा येथे आयोजित करण्यात आला आहे.

### अनधिकृत वाळूउपशावर कारवाई

**पनवेल :** तालुक्यातील कासारभाट येथे अनधिकृत वाळूउपसा करून बेकायदा वाळूची साठवणूक केली असल्याची माहिती पनवेल महसूल विभागास गोपनीय सूत्रांकडून मिळाली. कासारभाट ते डोलघर जुन्या रस्त्याच्या डाव्या बाजूला जमिनीतून सेक्शन पंपाच्या साहाय्याने वाळू काढलेली दिसून आली. रस्त्याच्या किनारी वाळू साठवण्याकरिता तयार केलेली कुंडी निदर्शनास आली, परंतु त्या कुंडीत वाळूचा साठा दिसून आला नाही. त्याचप्रमाणे कोणीही उपस्थित नसल्याने वाळू उत्खनन कोणी केले याबाबतदेखील महसूल विभागाला अद्याप उत्तर सापडले नाही. या ठिकाणी सेक्शन पंपात पाणी शिरून बुडालेल्या अवस्थेत दिसून आले. त्या अनुषंगाने गुरुवारी पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी विश्वनाथ कचरे पाटील, श्रीनिवास पाटील, भावेश पाटील यांनी जेसीबीच्या साहाय्याने हा वाळूचा साठा नष्ट केला. याबाबत गुन्ह्याची नोंददेखील करण्यात आली आहे.

### पनवेल परिसरात आढळले अर्भक

**पनवेल :** पनवेल परिसरात एका अल्पवयीन मुलीचे अर्भक आढळल्याने एकच खळबळ उडाली असून या मुलीच्या आई-वडिलांचा शोध शहर पोलीस करीत आहेत. नांदगाव परिसरातील एका झाडीमध्ये एका नवजात बालकाचे अर्भक आढळले आहे. याबाबत शहर पोलीस परिसरात कसून चौकशी करीत आहेत. या संदर्भात शहर पोलिसांनी अज्ञात आई-वडिलांविरोधात गुन्हा नोंद केला आहे, तसेच या संदर्भात कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी शहर पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहनसुद्धा करण्यात आले.



**उरण : चिरनेर कातळपाडा येथील दत्तगुरूंच्या ग्रामप्रदक्षिणा भिक्षा व पदयात्रा दिंडीमध्ये भक्तगण 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद बल्लभ दिगंबरा' व 'ज्ञानोबा माऊली तुकाराम'च्या जयघोषात तल्लीन झाले होते. जागोजागी महिला भगिनींनी दत्तगुरूंच्या प्रतिमेला ओवाळणी केली.** (छाया : जीवन केणी)

# नवी मुंबईतील कोरोना पॉझिटिव्ह विद्यार्थ्यांमध्ये वाढ

## घणसोलीतील आकडा १८वर; पालक धास्तावले

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्य सरकारने डिसेंबरपासून इयत्ता पहिली ते सातवीचे वर्ग सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार आता राज्यातील शाळा तब्बल दोन वर्षांनी सुरू झाल्या आहेत, मात्र अजूनही कोरोना आणि ओमायक्रॉनचे संकट आहेच. सरकारने शाळा सुरू करण्याच्या अगोदर नियमावलीदेखील जारी केली होती, मात्र असे असतानादेखील नवी मुंबई येथून धक्कादायक माहिती पुढे आली. घणसोलीतील शेतकरी विद्यालयातील तब्बल १८ विद्यार्थी कोरोना पॉझिटिव्ह आल्याने शाळा व विद्यार्थी यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

मागील तीन दिवसांत ८०० विद्यार्थ्यांच्या कोरोना चाचण्या करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये १८ विद्यार्थी कोरोना पॉझिटिव्ह आढळले आहेत. कतारवरून आलेल्या व्यक्तीचा कोरोना रिपोर्ट निगेटिव्ह आला, मात्र त्यांचा मुलगा कोरोना पॉझिटिव्ह निघाला. हा मुलगा घरात न थांबता शाळेत गेल्याने इतर विद्यार्थी कोरोना पॉझिटिव्ह झाले असल्याचे शाळा प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. आता सर्व विद्यार्थ्यांना वाशी येथील कोविड सेंटरमध्ये ठेवण्यात आले आहे. सर्वांची तब्बेत उत्तम असल्याचेदेखील सांगितले जात आहे.



आज पुन्हा नवी मुंबई महापालिकेच्या तीन टीम कोरोना चाचणी करण्यासाठी शाळेत दाखल झाल्या होत्या, मात्र घाबरून विद्यार्थी शाळेत आले नाहीत. जे विद्यार्थी शाळेत आले नाहीत. त्याची घरोघरी जाऊन कोरोना चाचणी केली जाणार असल्याची माहिती आहे.

शाळासंदर्भात राज्य सरकारकडून नियमावली जारी करण्यात आली होती, मात्र तरीही एकाच शाळेतील तब्बल १८ विद्यार्थी कोरोना पॉझिटिव्ह आल्यामुळे पालकांनी चांगलीच धास्ती घेतली आहे. तसेच शाळा व विद्यार्थी यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

ज्या प्रथम विद्यार्थ्यामुळे इतर विद्यार्थी कोरोनाबाधित झाले आहेत, त्याची जिनोम सिक्वेन्स चाचणीसाठी नमुने पुण्याला पाठवण्यात आल्याची माहिती नवी मुंबई महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी दिली आहे.

■ **शाळेचे होणार निर्जंतुकीकरण**

***घणसोलीमधील शेतकरी शिक्षण संस्था शाळेतील विद्यार्थ्यांना कोरोनाची लागण झाली आहे. यामुळे आता इतर विद्यार्थी आणि शिक्षकांचीदेखील कोरोना चाचणी करण्यात येत आहे. मुलांना कोरोनाची लागण होत असल्याने पालकांची चिंता वाढली आहे. महानगरपालिका प्रशासनाने शाळेचे निर्जंतुकीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे.***

## रेल्वेस्थानकांमध्ये लसीकरणाला प्रतिसाद

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

लोकल प्रवासावरील काही निर्बंध हटिवण्यात आल्यानंतर नवी मुंबई महापालिका प्रशासनाने प्रवाशांसाठी शहरातील पाच रेल्वे स्थानकांवर लसीकरण केंद्र सुरू केली आहेत. शहरातील इतर केंद्रांवर लसीकरणाला प्रतिसाद मिळत नसला, तरी या केंद्रांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत या केंद्रांवर ११,१२० लसमात्रा देण्यात आल्या असून यात दुसरी लस घणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे.

शहरात लसीकरणासाठी पात्र असलेल्यांची संख्या ११ लाख सात हजार गृहित धरली होती. यानुसार पहिल्या मात्राचे लसीकरण पूर्ण झाले आहे, मात्र दुसरी मात्रा घेतलेल्यांची संख्या अद्याप कमी असून ती ८० टक्क्यांपर्यंतच आहे. यासाठी पालिका प्रशासनाचे प्रयत्न सुरू आहेत. यासाठी महापालिकेच्या विविध रुग्णालयांसह २० मार्केट, २३ नागरी आरोग्य केंद्र, तसेच पाच रेल्वेस्थानकावरही लसीकरण सुविधा देण्यात येत आहे. याशिवाय शहरात फिरत्या वाहनांद्वारे लसीकरण केले जात आहे. यात रेल्वे स्थानकावरील केंद्रांना चांगला प्रतिसाद मिळत आहे.



**नवी मुंबईकर नागरिकांना लसीकरणासाठी विविध ठिकाणी लसीकरण केंद्र सुरू करण्यात आली असून रेल्वेस्थानकावर असलेल्या लसीकरण केंद्रामुळे लस घेणाऱ्या रेल्वेप्रवाशांना चांगली सुविधा उपलब्ध असून त्या ठिकाणी दुसरी लसमात्रा घेणाऱ्यांची संख्या अधिक आहे.**
**-डॉ. रत्नप्रभा चव्हाण, लसीकरण प्रमुख**

नवी मुंबईतून रेल्वेमार्गाने प्रवास करणाऱ्यांची संख्या खूप मोठी आहे. त्यामुळे वाशी, नेरूळ, घणसोली, कोपरखैरणे, ऐरोली पाच प्रमुख स्थानकावर लसीकरण सुविधा सुरू आहे. या सर्वस्थानकांवरील पहिली लस मात्रा घेणाऱ्यांपेक्षा दुसरी लसमात्रा घेणाऱ्यांची संख्या अधिक आहे. कामाच्या ठिकाणी जाताना किंवा घरी परत येताना रेल्वेप्रवासी लसीकरण करून घेत आहेत.

## भाजप कळंबोली मंडलतर्फे पिशव्यांचे वाटप

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेमार्फत मोफत धान्य वाटप सुरू असताना पिशव्यांचे वाटप कळंबोळी मंडलतर्फे करण्यात आले. हा कार्यक्रम संयोजक संतोष मानसिंग गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला.



या वेळी कळंबोली सरचिटणीस संजय दोडके व सरचिटणीस दिलीप बिष्ट, उपाध्यक्ष संदीप भगत, ज्येष्ठ कार्यकर्ते देविदास खेडेकर, भिसे व रवी जाधव, महिला प्रभाग अध्यक्ष अंजली पाटकर, महिला मोर्चाचे सरीता, साक्षी गावडे आणि अन्य पदाधिकारी उपस्थित होते.



**पनवेल : शिरवली ग्रामपंचायतीचे भाजपचे सरपंच दीपक बोंडे यांना वाढदिवसानिमित तालुका चिटणीस नामदेव जमदाडे, द्वारकानाथ बोलाडे, रवींद्र पाटील, पद्माकर म्हसकर, बाळाराम ऊसाटकर, संजय पाटील, प्रमोद भगत, दिनेश फडके, परशुराम रिकामे, संतोष मुंढे, लहू मुंढे, महेश काठावले, परशुराम चोरघे, भालचंद्र सिनारे, सुरेश रिकामे यांनी शुभेच्छा दिल्या.**

## दिगंबरा दिगंबरा...





















**पनवेल : भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी दत्त जयंतीनिमित्त वावंजे, रिटघर, मोर्बे, दुंदरे, पाली, मोहोचा पाडा, शिवकर, पाटनोली, आरिवली, शिवाजीनगर, गव्हाण, बामणडोंगरी, उलवे नोड, कोपर येथील मंदिरांत जाऊन दर्शन घेतले. सोबत तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, भाविक.**

## कोरोनामुळे दगावलेल्या व्यक्तीच्या नातेवाईकांना अर्जासाठी आवाहन

**पनवेल : प्रतिनिधी**

कोरोनाने मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या वारसांनी किंवा निकटच्या नातेवाईकांनी सानुग्रह मदत मिळण्याबाबत शासनाने कार्यान्वित केलेल्या ऑनलाइन वेबपोर्टलवर ऑनलाइन अर्ज दाखल करावे, असे आवाहन पनवेल महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.

सानुग्रह सहाय्य प्राप्त करून घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाइन अर्ज दाखल करता येईल. यासाठी अर्जदाराने www.mahacovid19relief.in या संकेतस्थळावर लॉगिन करणे आवश्यक राहील. याकरिता अर्जदार स्वतः किंवा सेतु केंद्रामधून किंवा ग्रामपंचायतीमधून सीएससी-एसपीव्हीमधून अर्ज करू शकेल.

अर्जदारास स्वतःचा मोबाइल क्रमांक वापरून सहाय्य मिळण्यासाठी लॉग-इन करता येईल. जर एखादे प्रकरण नामंजूर झाल्यास जिल्हास्तरावरील तक्रार निवारणासाठी गठीत करण्यात आलेल्या तक्रार निवारण समितीचे सचिव डॉ. आनंद गोसावी यांच्यामार्फत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे तक्रार अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## सहाय्यक पोलीस आयुक्त कार्यालयाचे उद्‌घाटन

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**


सहाय्यक पोलीस आयुक्त कार्यालय विस्तारित व नुतनीकरणचे उद्‌घाटन नवी मुंबई पोलीस आयुक्त बिपीन कुमार सिंह यांच्या हस्ते बुधवारी (दि. १५) सहाय्यक पोलीस आयुक्त कार्यालय पोर्ट विभाग येथे झाले. यासोबत त्यांच्या हस्ते सहाय्यक पोलीस आयुक्त (पोर्ट विभाग) सचिन सावंत यांना आयएसओ मानांकन प्रमाणपत्र देऊन अभिनंदन करण्यात आले.

या वेळी नवी मुंबई सह पोलीस आयुक्त डॉ. जय जाधव, पोलीस उपायुक्त (गुन्हे) सुरेश मेंगडे, पोलीस उपायुक्त (वाहतूक) पुरुषोत्तम कराड, सीआयएसएफचे कमांडर विष्णू सहाय, नवी मुंबई परिमंडळ १चे पोलीस उपायुक्त विवेक पानसरे, नवी मुंबई मुख्यालयाचे उपायुक्त अभिजित शिवथरे, पोलीस उपायुक्त परिमंडळ २ पनवेलचे शिवराज पाटील, सहाय्यक आयुक्त (पोर्ट विभाग) सचिन सावंत, मोरा सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अभिजित मोहिते, न्हावा-शेवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक मधुकर भटे, उरण पोलीस ठाण्याचे निरीक्षक सोनावणे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितेश पंडित यांनी केले.






# या आहेत आर्थिक साक्षरतेच्या दमदार पाऊलखुणा!




अर्थ प्रहर



यमाजी मालकर
(ymalkar@gmail.com)

**शेअर बाजारात गुंतवणूक करण्यासाठी आवश्यक असलेल्या डीमॅट खात्यांची दुपटीने वाढलेली संख्या असो, एसआयपीच्या मार्गाने केली जाणारी म्युच्युअल फंडांतील विक्रमी गुंतवणूक असो की एनपीएस किंवा अटल पेन्शन योजनेतील वाढता सहभाग असो. नव्या आर्थिक बदलांत भारतीय नागरिक सहभागी होताना दिसत आहेत. आर्थिक साक्षरतेत मागे असलेल्या भारतीय समाजाने ती चूक दुरुस्त करण्याचे ठरविलेले दिसते आहे.**

आपल्या देशात होत असलेल्या नव्या आर्थिक बदलांमध्ये नागरिक सहभागी होत आहेत की नाही, हे पाहणे महत्त्वाचे आहे. कारण हे बदल इतके मूलभूत आहेत की त्यात जर सर्वसामान्य नागरिकांना भाग घेता आला नाही, तर त्या बदलांना तसा काही अर्थ राहणार नाही. सरकार, रिझर्व्ह बँक, सेबी, Interim Pension Fund Regulatory Development Authority (PFRDA) आणि संबंधित आर्थिक संस्था यांच्या प्रयत्नाने हे नवे बदल नागरिकांपर्यंत पोचत आहेत आणि त्यामुळे आर्थिक सहभागीत्व वाढत आहे, असे गेल्या काही दिवसांतील आकडेवारी सांगते. भारतीय नागरिकांमध्ये आर्थिक साक्षरतेची मोठी गरज आहे. तिला सध्या चांगलीच चालना मिळाली आहे, असे आपण हे आकडे पाहून निश्चितच म्हणू शकतो.

## डीमॅट खातेधारकांची संख्या ७.४ कोटी

शेअर बाजाराविषयी आपल्या समाजात अनेक गैरसमज आहेत. पण शेअर बाजारात गुंतवणूक हा जगातला गुंतवणुकीचा लोकप्रिय प्रकार आहे. त्यामुळे त्याच्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही, हे अनेक भारतीय गुंतवणूकदारांनाही आता उमजले आहे. त्याची प्रचीती गेल्या काही महिन्यांत उघडल्या गेलेल्या डीमॅट खात्यांनी दिली आहे. गेल्या तीन वर्षांत अशा खातेधारकांची संख्या




दुपटीपेक्षाही अधिक वाढली आहे, तर चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सात महिन्यांत ती गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत तब्बल ३० टक्क्यांनी वाढली आहे. एप्रिल ते ऑक्टोबर या सात महिन्यांत १.९ कोटी नागरिकांनी डीमॅट खाती काढली. म्हणजे दर महिन्याला सरासरी २६.७ लाख! २०१८-१९ मध्ये डीमॅट खातेधारकांची संख्या ३.६ कोटी होती, ती नोव्हेंबर २०२१ अखेर ७.४ कोटी झाली आहे, यावरून या वाढीचा वेग लक्षात येतो. शेअर बाजारात गुंतवणूक वाढली की इतर गुंतवणुकीवर त्याचा साहजिकच परिणाम होतो आहे. या काळात बँक आणि पोस्टातील गुंतवणूक योजनांमधील गुंतवणूक कमी होते आहे. गेली काही वर्षे देशात बँकिंग वाढत असल्याने व्याजदर कमी होत असून त्याचा अर्थव्यवस्थेला आणि कर्ज घेणाऱ्या नागरिकांना फायदा होतो आहे. एफडीसारख्या गुंतवणुकीचे व्याजदर कमी होत असल्याने अशा गुंतवणुकीकडील ओढा कमी होऊ लागला आहे. २०१८-१९ मध्ये अशी ४.६६ कोटी खाती उघडण्यात आली होती, ती संख्या या आर्थिक वर्षात नोव्हेंबर अखेर २.३३ कोटी इतकी आली आहे, याचा अर्थ त्यात चांगलीच घट झाली आहे.

## दर महिन्याला ११ हजार कोटी रुपये

नव्या आर्थिक बदलानुसार भारतीय गुंतवणूकदार आपले मार्ग कसे बदलत आहेत, याची प्रचीती शेअर बाजारातील अप्रत्यक्ष गुंतवणूक मानल्या जाणाऱ्या म्युच्युअल फंडातील वाढत असलेल्या गुंतवणुकीवरून येते आहे.म्युच्युअल फंडात दर महिन्याला विशिष्ट रक्कम जमा करण्यास एसआयपी असे म्हटले जाते. अशा मार्गाने ११ हजार ६१५ कोटी रुपये भारतीय गुंतवणूकदारांनी गेल्या नोव्हेंबरमध्ये गुंतविले आहेत. दर महिन्यातील एसआयपीची रक्कम वाढत असल्याचा हा नववा महिना आहे. गेल्या मार्चपासून असे ८५ हजार ३८१ कोटी रुपये शेअर बाजारात आले आहेत. जुलै २० ते फेब्रुवारी २१ या दरम्यान ४६ हजार ७९१ कोटी रुपये काढून घेतले गेले होते, या पार्श्वभूमीवर ही वाढ लक्षणीय आहे. त्याचाच परिणाम म्हणजे सर्व म्युच्युअल फंडांचे व्यवस्थापन करणाऱ्या एएमएफआयकडे सध्या ३८ लाख कोटी रुपये इतका निधी आहे. हा आता पर्यंतचा उच्चांक आहे. ही आकडेवारी अनेक अर्थानी महत्त्वाची आहे. शेअर बाजारातील थेट गुंतवणुकीमध्ये अधिक जोखीम असते, जी सर्वांनाच सहन होते, असे नाही. असे नागरिक म्युच्युअल फंडांच्या मार्गाने या गुंतवणुकीचा लाभ घेत आहेत, असे हे आकडे सांगतात. दुसरे म्हणजे या गुंतवणुकीतील सर्वाधिक वाटा फ्लेक्झी फंडांत (दर महिन्याला दोन हजार ६६० कोटी रुपये) जातो आहे, याचा अर्थ तेथेही लार्ज, मिड आणि स्मॉल कॅप कंपन्यांमध्ये गुंतवणूक करणारे, म्हणजे कमी जोखीम असलेले फंड गुंतवणूकदार निवडत आहेत. विदेशी गुंतवणूकदारांनी गेले काही महिने भारतीय शेअर बाजारातून पैसे काढून घेण्याचा सपाटा लावला आहे, तरीही शेअर बाजार अधिक कोसळला नाही, त्याचे कारण भारतीय नागरिकांनी भारतीय अर्थव्यवस्थेवर या मार्गाने दाखविलेला विश्वास आहे, हेही यातून स्पष्ट होते.

## एनपीएसची सदस्यसंख्या ४.७१ कोटी

Interim Pension Fund Regulatory Development Authority (PFRDA) ही संस्था राष्ट्रीय पेन्शन योजना राबविते. तिने गेल्या काही वर्षांत अनेक सकारात्मक बदल केले असून त्यामुळे निवृतीसाठी गुंतवणूक करणे सोपे, तसेच आर्थिकदृष्ट्या आकर्षक झाले आहे. त्याचा थेट परिणाम म्हणजे एनपीएसच्या मार्गाने निवृती काळासाठी गुंतवणूक करणाऱ्यांची संख्या सातत्याने वाढताना दिसते आहे. गेल्या नोव्हेबरमध्ये केंद्र आणि राज्य सरकारच्या अनुक्रमे २२.४४ लाख आणि ५४.४४ लाख कर्मचाऱ्यांनी या योजनेत भाग घेतला आहे. त्यामुळे या योजनेची सदस्य संख्या नोव्हेंबर अखेर ४.७१ कोटींवर पोचली आहे. कोणाही भारतीय नागरिकाला अशा योजनेत सहभागी होता येते. अशा सदस्यांनी आपल्या भविष्यातील गरजांसाठी सहा कोटी ८७ लाख ४६८ कोटी रुपये जमा केले असून गेल्या वर्षाच्या तुलनेत त्यात तब्बल २९ टक्के वाढ झाली आहे. ही सर्व आकडेवारी वाढती दिसत असली, तरी असंघटीत क्षेत्रातील नागरिकांच्या निवृती वेतनाचा प्रश्न उरतोच. त्याचा विचार करून सरकारने काही वर्षांपूर्वी अटल पेन्शन योजना सुरू केली आहे. त्या योजनेची सदस्य संख्याही आता ३.२५ कोटींवर गेली आहे. तिच्या सदस्यसंख्येतही तब्बल ३० टक्के वाढ नोव्हेंबर अखेर नोंदविली गेली आहे, याचा अर्थ असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या, कमी उत्पन्न गटातील नागरिकांमध्येही ही जागरूकता वाढते आहे. अनेक वर्षे मागे असलेले सर्वच स्तरातील भारतीय नागरिक आता आर्थिक साक्षरतेचे धडे घेत आहेत, असेच यावरून स्पष्ट होते.




## निवृतीसाठी गुंतवणुकीचे महत्त्व मान्य

कोणत्याही गुंतवणुकीचा उद्देश हा आपला भविष्यकाळ सुरक्षित करणे किंवा भविष्यातील काही गरजा भागविणे हा असतो. तरुणपणी आणि प्रौढ वयात अधिक जोखीम घेऊन त्यासाठी गुंतवणूक केली जाते, पण जेव्हा साठी जवळ येते, तेव्हा जोखीम घेणे अपेक्षित नसते. शिवाय या वयातील ज्या आर्थिक गरजा असतात, त्याची तरतूद निवृती योजनांमध्ये भाग घेऊन करावयाची असते. एकत्र कुटुंबपद्धती आणि शेती संस्कृतीमुळे भारतीय समाजात अशा तरतुदीला कधी महत्त्वाचे मानले गेले नाही, पण आता कुटुंबही विभक्त होत असून शहरी भागात राहणाऱ्या नोकरदारांची संख्या वाढू लागली आहे. असे नागरिक साठीनंतरच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी तरतूद करत आहेत का, या प्रश्नाचे उत्तर 'होय' असे आहे. पूर्वी कधीही केली जात नव्हती, एवढी तरतूद निवृतीसाठी भारतीय नागरिक करत आहेत, असे आकडेवारी सांगते.

# बाजार खाली जात असताना करा व्हॅल्यू इन्व्हेस्टिंग

**शेअर बाजारात गुंतवणूक करून चांगला परतावा मिळविण्याचे अनेक मार्ग सांगितले जातात. त्यात व्हॅल्यू इन्व्हेस्टिंग या मार्गाची नेहमीच चर्चा होते. विशेषतः बाजार खाली येतो, तेव्हा या प्रकारची गुंतवणूक करण्याची संधी असते. भारतीय बाजार सध्या असाच खाली येतो आहे. त्यामुळे व्हॅल्यू इन्व्हेस्टिंग म्हणजे काय, हे समजून घेणे संयुक्तिक ठरेल.**



प्रसाद ल. भावे
sharpadvisers@gmail.com

व्हॅल्यू इन्व्हेस्टिंग हा शब्द आपण बऱ्याच वेळा ऐकतो, वाचतो, परंतु अनेक जणांना खरोखरीच व्हॅल्यू इन्व्हेस्टिंग म्हणजे काय व ते कसं होतं याबद्दल बहुधा माहिती नसते. तर व्हॅल्यू म्हणजेच किंमत किंवा मूल्य हा शब्द लॅटीन भाषेपासून आलाय. लॅटीन भाषेतील मूळ शब्द आहे व्हॅलेर (valere) म्हणजे इंग्लिशमध्ये 'Be worth' म्हणजेच पात्रतेचा अथवा योग्यतेचा. आपल्या बोली भाषेत योग्य मूल्याचा. उदा. जर एखादा शेअर आपण हजार रुपयांना घेत आहोत तर त्याचं मूल्य हजार रुपये आहे का? जर ते हजारापेक्षा जास्त असेल तर तो शेअर नक्कीच अंडर व्हॅल्यूड असू शकतो म्हणजेच तो शेअर खरेदी करणं हे व्हॅल्यू इन्व्हेस्टिंग ठरू शकतं.


जेव्हा मॉलमध्ये सेल लागतात, कोणतीही गोष्ट डिस्काउंटमध्ये मिळते तेव्हा काहींना कोण आनंद होतो व लागलीच खरेदी होते. परंतु हीच गोष्ट जर शेअर बाजाराच्या बाबतीत झाली तर आपण लगेच सावध होतो व खरेदी लांबणीवर टाकतो. समजा एखाद्या कंपनीच्या शेअरचा भाव ११०० रुपयांवरून १०% पडून म्हणजेच ९९० रुपयांवर आला, तर रु. ११०० ला खरेदी करण्यास मागं पुढं न पाहणारा गुंतवणूकदार थबकतो व अजून भाव खाली जायची वाट पाहू लागतो मग प्रश्न असा पडतो की ११०० रुपयांवर त्या शेअरचं मूल्य ११०० रुपयांपेक्षा कमी होतं का? व जर याचं उत्तर नकारार्थी आलं तर मग आता तोच शेअर ९९० रुपयांस खरेदी करताना का विचार करावा लागतोय. मग खरोखरीच त्या शेअरचं मूल्य काय?

### प्रवाहाच्या विरोधात पोहावं लागेल

जर खरोखरीच त्या शेअरचं मूल्य ११०० रुपयांपेक्षा जास्त असल्यास व जर तोच शेअर ९९० रुपयांवर आल्यास तो खरोखरीच व्हॅल्यू इन्व्हेस्टिंग ठरू शकेल. तर असं हे व्हॅल्यू इन्व्हेस्टिंग करायचं कसं? याची सरळ सोपी व्याख्या म्हणजे, जास्त 'मूल्य' असलेल्या (भाव नाही) कंपनीचा शेअर कमी त्या मूल्याच्या कमी भावात खरेदी करणं. अशा वेळी नक्कीच तुम्हाला प्रवाहाच्या विरोधात पोहावं लागतं कारण भाव पडल्यावर (घाबरून) शेअर्स विकणारे बरेच असतात, परंतु ज्यांना चांगल्या कंपन्या माहीत आहेत त्यांचे शेअर्स पडत्या भावात खरेदी करणं ही उत्तम संधी असते व यालाच गोंडस शब्द आहे व्हॅल्यू इन्व्हेस्टिंग. याचा अजून एक फायदा आहे तो म्हणजे नुकसानीची शक्यता तुलनात्मकदृष्ट्या कमी असते.

### मूलभूत पृथक्करणाचे पिता

बेंजामिन ग्रहम यांनी या आर्थिक गुणोत्तारांचा सिद्धांत मांडला त्यामुळं त्यांना मूलभूत पृथक्करणाचे (फंडामेंटल अनालिसिस) पिता म्हणून ओळखलं जातं. फादर ऑफ व्हॅल्यू इन्व्हेस्टिंग म्हटल्या गेलेल्या बेंजामिन ग्रॅहम यांनी इ.स. १९२८ मध्ये आपल्या कल्पना कोलंबिया बिझनेस स्कूलमध्ये शिकविताना मांडल्या. उदाहरणादाखल पुस्तकी मूल्यापेक्षा कमी भावातील कंपन्या, उत्तम लाभांश परतावा देणाऱ्या कंपन्या, कमी पीई व पीबी असलेल्या कंपन्या इ. प्रकारच्या गोष्टी या व्हॅल्यू इन्व्हेस्टिंगमध्ये येतात. तर अशा व्हॅल्यू इन्व्हेस्टिंगसाठी पीई रेशो म्हणजेच भाव-उत्पन्न गुणोत्तर व भाव-पुस्तकीमूल्य गुणोत्तर (Price to Book Value) ही गुणोत्तरे, गुंतवणूकदारांच्या जरा जास्तच पसंतीची आहेत. पीई रेश्यो म्हणजे एका शेअरच्या मागील उत्पन्नाच्या किती पटीत शेअरचा बाजारभाव चालू आहे व पीबी रेश्यो म्हणजे पुस्तकी




मूल्याच्या किती पटीत बाजारभाव आहे. आजकाल कोणत्याही फायनान्शिअल वेबसाईटवर या गोष्टी आयत्या उपलब्ध असतात. बऱ्याच जाणकारांचं म्हणणं असतं की कमी पीई असलेला शेअर हा खरेदीसाठी उत्तम. परंतु कमी पीई व कमी पीबी रेशो असलेल्या कंपनीचा शेअर म्हणजेच व्हॅल्यू शेअर ठरत नाही.

### नफ्यातील सातत्य महत्त्वाचे

याउलट, माझं असं मत आहे की कोणती कंपनी (कमीतकमी) मागील पाच वर्षं सुसंगतपणे (consistently) नफा दर्शवत आहे ते पाहणं; आता सुसंगत म्हणजे एखाद्याच वर्षी खूप जास्त नफा व नंतर नफा कमी होत गेलेला, असं उपयोगाचं नाही तर प्रत्येक तिमाहीतील नफा हा मागील तिमाहीशी सुसंगत असावा. म्हणजेच ५-१०% कमी जास्त. कधी कधी काही प्रमाणात कमी झालेल्या नफ्याकडं कानाडोळा करता येऊ शकतो जर काही अपवादात्मक गोष्टी घडल्या असतील तर, उदा. क्रूड तेलाचे दर चढे असतील तर विमान वाहतूक कंपन्यांचा नफा हा तेवढ्या कालावधीपुरता मार खाणारच. जोपर्यंत अशा कंपन्या त्या प्रमाणात तिकीट भाव वाढीसाठी काही धोरण निश्चित करत नाहीत तोपर्यंत, तसेच भारतीय रुपयाच्या तुलनेत जर अमेरिकी डॉलर वधारला तर भारतीय आयटी कंपन्यांचे निकाल चांगलेच लागणार. म्हणूनच साधारणपणे अशा कंपन्यांनी मागील पांच वर्षांत (वार्षिक) उत्पन्न व नफा यांतील वाढ ही कमीतकमी १०-१२% नोंदवलीय का हे पाहणं जास्त महत्त्वाचं ठरतं. यात सुद्धा अजून एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे या कंपन्यांचा नफा हा कंपनीच्या इतर उत्पन्नातून न येता तो प्रामुख्यानं कंपनी कार्यरत असलेल्याच व्यवसायातून आलेला आहे का हे पाहणं जास्त महत्त्वाचं ठरतं.

### फंडामेंटल्स तपासावयास हवीत

अजून एक महत्त्वाचा रेश्यो म्हणजे ROCE (रिटर्न ऑन कॅपिटल एम्प्लॉयीड) म्हणजेच कंपनीचे व्याज व कर हे वजा करायच्या आधीचा नफा भागिले लावलेलं भांडवल गुणिले १००. हा रेश्यो, कंपनीचा फायदेशीरपणा व कार्यक्षमता ज्यासाठी भांडवलाचा उपयोग केला गेलाय या गोष्टी दाखवतो. जेवढं हे गुणोत्तर जास्त तेवढं भांडवलाचा योग्य अथवा कार्यक्षमतेनं वापर. आता येथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की जास्त शिल्लक रोकड असणाऱ्या कंपन्यांच्या बाबतीत हा रेश्यो विपरीत राहतो. कारण रोकड ही भांडवलात गृहित धरली जाते जरी ती उपयोगात आणली गेली नसेल तरी. अजून एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे दोन कंपन्यांची तुलना रेश्यो माध्यमातून करताना हे पाहणे महत्त्वाचे ठरते की यां दोन्ही कंपन्या एकाच व्यवसायात आहेत का.

या आणि अशा प्रकारची गुणोत्तरं, त्यांची त्याच क्षेत्रातील इतर कंपन्यांच्या गुणोत्तरांशी केलेली तुलना व त्यात कसोटीस उतरलेल्या अथवा उजव्या ठरलेल्या कंपन्यांस आपण फंडामेंटली स्ट्राँग कंपन्या म्हणू शकतो. कोणत्याही कंपनीचा शेअर घेण्याआधी त्या कंपनीचे फंडामेंटल्स (मूलभूत अथवा पायाभूत तत्त्वं) काय आहेत ती तपासावयास हवीत, म्हणजेच त्या कंपनीची विविध फायनान्शियल स्टेटमेंट्स; कंपनी ज्या क्षेत्रात कार्यरत आहे, ते क्षेत्र; व्यवस्थापन, इ. फायनान्शियल स्टेटमेंट्समध्ये वार्षिक अहवाल, नफा-तोटा विवरणपत्र, ताळेबंद, उत्पन्न/कॅशफ्लो, आर्थिक गुणोत्तरं इ. येतात. तर आपण यांबद्दल थोडक्यात जाणून घेऊ.

### वार्षिक अहवाल (Annual Report) :

आर्थिक वर्षाअखेरीनंतर हा रिपोर्ट प्रकाशित केला जातो जो आपणास त्या कंपनीच्या वेबसाईटवर सहज उपलब्ध होऊ शकतो. कंपनीच्या वार्षिक अहवालातील मुख्य अभ्यासण्यासारख्या गोष्टी म्हणजे व्यवस्थापन विचारविनिमय (Management discussion) व चेअरमन मेसेज. पहिल्या सदरात आपणांस देशाच्या अर्थविषयक कृती व संस्थात्मक जगातील व्यावसायिक मत, तसेच उद्योगक्षेत्रातील प्रवाह व येत्या वर्षातील अपेक्षा/गृहितं यांबद्दल ऊहापोह असतो व आगामी वर्षाबद्दल व्यूह व आडाखे देखील मांडलेले असू शकतात, तर नंतरच्या सदरात आपणास कंपनी योग्य व्यक्तीच्या हातात आहे का याबद्दल खात्री करता येऊ शकते. कंपनीचे व्यवहार पारदर्शक आहेत का, हे समजू शकतं. व्यवस्थापन किती वास्तव आहे हे कळू शकतं. यांनंतर मनुष्यबळ (HR) रिपोर्ट, रिसर्च आणि डेव्हलपमेंट रिपोर्ट इ. गोष्टी महत्त्वाच्या असतात. जर आम्ही वस्तूनिर्माण (manufacturing) कंपनीचा अभ्यास करत असू तर, मनुष्यबळ विकास रिपोर्टमधे आम्ही पाहू शकतो की कंपनीत कामगारांसंबंधी काही समस्या आहेत का.

आता वळू आर्थिक विवरणपत्रांकडं (फायनान्शियल स्टेटमेंट्सकडं), यातदेखील दोन प्रकार असतात, स्वतंत्र (स्टँडअलोन) व एकत्रित (कान्सोलीडेटेड). जर मुख्य कंपनीची कोणती दुसरी दुय्यम-पूरक (सब्सिडरी) कंपनी असल्यास त्या सब्सिडरी कंपनीचा नफा/तोटा मुख्य (होल्डिंग/पेरेंट) कंपनीच्या नफ्या/तोट्यासह दाखवला गेल्यास त्यास कन्सोलिडेटेड स्टेटमेंट्स म्हणतात अन्यथा फक्त मुख्य कंपनीच्या स्टेटमेंट्सला स्टँडअलोन म्हणतात.

### नफा-तोटा विवरणपत्र (PL स्टेटमेंट)

यामध्ये मुख्यत्त्वे, कंपनीचा ठराविक अवधीचा महसूल, महसूलासाठी आलेला खर्च, कर व घसारा आणि प्रतीशेअर उत्पन्न या गोष्टींचा समावेश असतो. संपूर्ण उत्पन्नातून कंपनीचा खर्च उदा. (कच्चा माल, पगार-पाणी, भरलेलं व्याज, घसारा व कंपनी चालवताना आलेला इतर खर्च) वजा केल्यावर करपूर्व नफा मिळतो व त्यातून कर वजा केल्यास करपश्चात नफा काढता येतो. यालाच नक्त नफा किंवा PLची बॉटम लाईन देखील म्हणतात. या नक्त नफ्यास विक्रीस काढलेल्या शेअर्सच्या संख्येनं (issued shares) भागल्यास जी संख्या येते त्यास प्रतीशेअर उत्पन्न म्हणजेच Earning Per Share (ईपीएस) म्हणतात. ज्याला या अभ्यासात फार वरचं स्थान आहे. याच संख्येनं जर कंपनीच्या शेअर्सच्या बाजारभावास भागल्यास जे उत्तर येतं त्यास पीई रेशो म्हणजेच किंमत उत्पन्न गुणोत्तर.

### ताळेबंद (Balance-sheet)

PL स्टेटमेंट आम्हाला त्या अवधीत कंपनीची कामगिरी कशी होती हे दाखवू शकतं तर ताळेबंद आपणांस कंपनीची मालमत्ता (asset) व दायित्व (liability) यावरून कंपनीचा आतापर्यंतचा विकास दाखवतो. येथे अजून एक महत्त्वाची बाब समोर येते, ती म्हणजे दायित्व नसलेली म्हणजे (long term borrowing नसलेली) म्हणजे शून्य ऋण कंपनी. सध्याच्या घसरत्या बाजारात चांगल्या कंपन्यांचे शेअर्स पडत्या भावात खरेदी करण्याची संधी आहे. तर करूया सुरुवात फंडामेंटली स्ट्राँग कंपन्यांमध्ये व्हॅल्यू इन्व्हेस्टिंग करून...




# जांबरुंग धरणाचे काम रखडले

**खालापूर : प्रतिनिधी**

काम अपूर्ण असतानाही ठेकेदाराने यंत्रसामग्रीची बांधाबांध केल्याने खालापूर तालुक्यातील जांबरूंग धरणाचे काम पुन्हा ठप्प होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ४० वर्षे रखडल्यानंतर या धरणाचे काम २०१८ मध्ये सुरू झाले. दरम्यान, जोपर्यंत धरणाचे बांधकाम पूर्ण होत नाही, तोपर्यंत धरण परिसरातून यंत्रसामग्री हलवू देणार नाही, असा पवित्रा जांबरूंग गाव व पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी घेतला आहे.

(छाया : अरुण नलावडे)



खालापूर तालुक्याच्या केळवली रेल्वे पट्ट्यातील पाणी समस्या दूर व्हावी, यासाठी शासनाने फेब्रुवारी १९८० मध्ये जांबरूंग धरण उभारण्याचा निर्णय घेतला होता. २५६४.७१ घन मीटर पाणीसाठा क्षमतेच्या या धरणाच्या उभारण्यासाठी त्या वेळी ४९ लाख २० हजार ८४१ खर्चाची तरतूद राज्य शासनाने केली होती. ६१० मीटर लांब २७.२० मी. उंचीच्या या धरणाच्या दोन कालव्यातून जांबरूंग, उंबरविरा बीड खुर्द, वनी, केळवली, वांगणी, खरवई परिसरातील गावांची १८१ हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार होती. त्यासाठी १९.४ हेक्टर वन जमिनीचे संपादनही करण्यात आले आहे. त्यासाठी १५ लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत.

या प्रकल्पाला १९९० साली १४ लाख खर्च करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे, मात्र काही दिवसांतच या प्रकल्पाचे काम बंद पडले. ४० वर्षे रखडल्यानंतर या प्रकल्पासाठी नव्याने निविदा काढण्यात आली. त्यात धरण व सांडवा यासाठी १३ कोटी १७ लाख रुपयांची तरतूद करून काम सुरू करण्याचे आदेश पारित केले. २०१८ मध्ये या धरणाचे काम सुरू झाले. तोपर्यंत ४९ लाख रुपये खर्चाचा हा प्रकल्प ९१ कोटी रुपयांवर गेला होता.

२०१८ मध्ये या धरणाचे काम सुरू झाल्यानंतर ठेकेदाराने प्रथम भरावाचे सोपे काम ५० टक्के केले. त्याच्या बिलाची मोठी रक्कम खिशात घातल्यानंतर २०१९ पासून उर्वरित भराव, दोन कालवे, काही बांधकाम ही कामे करण्यास ठेकेदार टाळाटाळ करीत आहे. पावसाळा सरून दोन महिने उलटले, तरी ठेकेदाराने अद्याप काम सुरू केलेले नाही. संपूर्ण काम तीन वर्षात पूर्ण करण्याचे बंधन असताना, पाटबंधारे खात्याच्या उदासीनतेमुळे शिल्लक काम येत्या दोन वर्षात पूर्ण होईल की नाही अशी शंका उपस्थित करण्यात येत आहे.

दरम्यान, धरणाच्या ठिकाणी असणाऱ्या यंत्रसामग्रीची ठेकेदाराने बांधाबांध करण्यास सुरुवात केली आहे, मात्र स्थानिकांनी त्यास तीव्र विरोध दर्शविला आहे. जोपर्यंत धरणाचे काम पूर्ण होत नाही, तोपर्यंत एक घमेलेही इथून हलवू देणार नाही, असा इशारा सरपंच रमेश खांडेकर, सामाजिक कार्यकर्ते हुसेन खान, प्रशांत खांडेकर यांनी दिला आहे.

याबाबत लघु पाटबंधारे विभागाचे अभियंता भावेकर यांना विचारणा केली असता, माझी बदली झाली आहे. सध्या पदभार इतर अधिकाऱ्याकडे वर्ग केल्याचे त्यांनी सांगितले. तर प्रभारी कार्यभार असणारे अभियंता नलवाड यांनी हे काम कोणत्याही परिस्थितीत तडीस नेण्यासाठी प्रयत्न करू, असे सांगितले.

## बैलगाडा संघटनेकडून कर्जत शेलू येथे जल्लोष

**कर्जत : प्रतिनिधी**

बैलगाडा शर्यतीला सशर्त परवानगी देण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे शुक्रवारी (दि. १७) कर्जत तालुक्यातील शेलू येथील मैदानावर स्वागत करण्यात आले. या वेळी प्रायोगिक तत्त्वावर बैलगाडा शर्यत घेऊन जल्लोष करण्यात आला.

प्राणीमित्र संघटनेकडून पेटा कायद्याची अंमलबजावणी करण्याची मागणी झाल्यानंतर राज्य सरकारने बैलगाडा शर्यतीवर बंदी आणली होती. तेव्हापासून गेली सात वर्षे बैलगाडा शर्यती बंद होत्या, मात्र सर्वोच्च न्यायालयाने बैलगाडा शर्यतीवरील बंदी उठवण्याचा निर्णय १६ डिसेंबर रोजी जाहीर केला. या निर्णयाचे स्वागत करण्यासाठी महाराष्ट्र बैलगाडा असोसिएशनने शुक्रवारी जल्लोष सोहळा आयोजित केला होता. त्याला रायगड, ठाणे, नगर, नाशिक आणि पुणे जिल्ह्यातील बैलगाडा मालकांनी गर्दी केली होती. या वेळी भर उन्हात किमान १० हजार बैलगाडा शर्यतप्रेमी उपस्थित होते. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी या वेळी जल्लोष केला. त्यानंतर बैलगाडा शर्यत आयोजित करण्यात आली होती. त्यात संघटनेचे राज्य अध्यक्ष पंढरीनाथ फडके आणि कल्याण येथील राहुल पाटील यांच्या बैलजोडीमध्ये शर्यत रंगली.



(छाया : संतोष पेरणे)

## शिवसेनेच्या नाकर्तेपणामुळे मतदारांमध्ये प्रचंड रोष

### काँग्रेस जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांची टीका



(छाया : शैलेश पालकर)

**पोलादपूर : प्रतिनिधी**

शिवसेनेच्या नाकर्तेपणामुळे मतदारांमध्ये प्रचंड रोष दिसून येत असून येत्या मतदानातून हा रोष मतदार व्यक्त करतील, अशी टीका काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी पोलादपूर येथे केली.

पोलादपूर नगरपंचायत निवडणुकीच्या मतदानाला काही दिवसच शिल्लक असून शुक्रवारी (दि. १७) दुपारी काँग्रेस जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत हे प्रभाग ९च्या उमेदवार तेजश्री अभिषेक गरूड आणि प्रभाग ११चे उमेदवार स्वप्नील सुभाष भुवड यांच्या प्रचारार्थ येथे आले होते. त्या वेळी ते बोलत होते.

या रॅलीत काँग्रेस जिल्हा सहप्रभारी श्रीरंग बर्गे, महाडच्या नगराध्यक्ष स्नेहल जगताप, जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, सरचिटणीस धनंजय देशमुख, सरचिटणीस प्रशांत महामुणकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती श्रीधर सकपाळ, खरेदी विक्री संघाचे चेअरमन बंडूशेठ देशमुख, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष अजय सलागरे, महाड तालुका अध्यक्ष राजू कोरपे, माजी तालुका अध्यक्ष कृष्णा शिंदे, विद्यार्थी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीयश जगताप, मार्तंड नाखवा, पोलादपूर शहर अध्यक्ष अमोल भुवड, युवक अध्यक्ष सचिन दुदुसकर, जिल्हा सरचिटणीस मुन्ना शिंदे, उपाध्यक्ष मयूर चांदोरकर, विधानसभा अध्यक्ष अ‍ॅड. सचिन गायकवाड, विधानसभा विद्यार्थी अध्यक्ष अनिकेत येरूणकर, तालुका अध्यक्ष प्रसाद देशमुख आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## सहकार सामर्थ्यवान करण्याची गरज -खासदार विनय सहस्त्रबुद्धे

### रोह्यात कुंडलिका सहकारी पतसंस्थेच्या नूतन वास्तूचे उद्‌घाटन

(छाया : महादेव सरसंबे)



**रोहे : प्रतिनिधी**

सहकार क्षेत्रातील संस्कार टिकले तरच सहकाराचे भवितव्य उज्ज्वल राहील. लोकशाही मजबूत करण्याचा मार्ग सहकारातून जात असल्याने सहकार चळवळ सामर्थ्यवान करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन खासदार विनय सहस्त्रबुद्धे यांनी शनिवारी (दि. १८) रोहे येथे केले.

रोह्यातील कुंडलिका नागरी सहकारी पतसंस्थेच्या नूतन वास्तूचे उद्‌घाटन खासदार विनय सहस्त्रबुद्धे यांच्या उपस्थितीत शनिवारी करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. सहकार क्षेत्रावर नागरिकांचा आजही विश्वास आहे, असे त्यांनी सांगितले.

व्यक्तिगत विचार बाजूला ठेवून सामूहिकतेचा विचार जपला म्हणून कुंडलिका सहकारी पतसंस्थेला यश मिळाले, असे गौरवोद्‌गार खासदार सहस्त्रबुद्धे यांनी या वेळी काढले. खासदार सुनील तटकरे यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक जोशी यांनी केले. कुंडलिका नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर जोशी, उपाध्यक्ष विवेक वत्सराज, प्रल्हाद भाटे, नगर परिषदेतील गटनेते महेंद्र गुजर यांच्यासह पतसंस्थेचे संचालक, भागधारक आणि नागरिक या कार्यक्रमाला उपस्थित होते.

## माथेरान घाटात दुचाकी-टॅक्सीचा अपघात; दोन जण गंभीर जखमी

**कर्जत : बातमीदार**

नेरळ-माथेरान घाटात दुचाकीने प्रवासी टॅक्सीला ठोकर दिली. या अपघातात दुचाकीवरील दोन तरुण गंभीर जखमी झाले. त्यांना कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



विनोद रामा वाघे (रा. कोल्हारेवाडी, ता. कर्जत) आणि त्याचा मित्र जहिरुद्दीन शेख (रा. तळवडे आदिवासीवाडी, ता. कर्जत) हे दोघे दुचाकी (एमएच ४६, एए ९९९२) वरून नेरळला जात होते. माथेरान घाटात त्यांची दुचाकी प्रवासी कार (एमएच १४, सीएक्स ७४८५)वर जाऊन आदळली. या अपघातात दुचाकीस्वार जहिरुद्दीन शेख व विनोद वाघे गंभीर जखमी झाले. नेरळमध्ये प्राथमिक उपचार केल्यानंतर त्यांना कामोठे एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## रोहा अष्टमीत पाणीबाणी; चार दिवसांपासून पाणीपुरवठा बंद

### नगर परिषदेच्या गलथान कारभाराचा नागरिकांना फटका

**धाटाव : प्रतिनिधी**

जलवाहिनी दुरुस्तीसाठी नगर परिषदेने पाणीपुरवठा बंद केल्याने रोहा अष्टमी शहरात गेल्या चार दिवसांपासून पाणीबाणी निर्माण झाली आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांची फरपट सुरू आहे. शुक्रवारपासून टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला असला, तरी तो अपुरा असल्याने नगर परिषदेच्या गलथान कारभाराचा फटका नागरिकांना बसत आहे.

रोहा शहराला डोलवहाळ धरणातून पाणीपुरवठा केला जातो. या धरणापासून टाकण्यात आलेल्या जलवाहिन्या जुनाट झाल्याने साडेतेरा कोटी रुपये खर्च करून नवीन जलवाहिन्या टाकण्यात आल्या, मात्र नव्याने टाकण्यात आलेली जलवाहिनी वारंवार नादुरुस्त होत आहे. चार दिवसांपूर्वी ही जलवाहिनी फुटली असून तिच्या दुरुस्तीसाठी रोहा शहराचा पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे. त्यामुळे अख्ख्या शहरात गेल्या चार दिवसांपासून पाणीटंचाई निर्माण झाली आहे. नागरिकांना आजूबाजूच्या गावांमधून पाणी विकत घ्यावे लागत आहे. नगर परिषदेने शुक्रवारपासून टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू केला असला, तरी लोकसंख्येच्या तुलनेत हे पाणी अपुरे पडत आहे. जलवाहिनी दुरुस्ती पूर्ण होण्यासाठी आणखी दोन दिवस लागणार असल्याने नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागणार आहे.



(छाया : जितेंद्र जाधव)

**जलवाहिनी दुरुस्तीचे काम शनिवारी रात्रीपर्यंत पूर्ण करण्यात येईल, त्या रात्री उशिरा अथवा रविवारी सकाळी नागरिकांना पाणी उपलब्ध करून देण्याचे आमचे प्रयत्न आहेत.**

**-दयानंद गोरे, मुख्याधिकारी, रोहा नगर परिषद**

**पाणीपट्टी वसूल करून नियमित पाणीपुरवठा करायचा नाही शिवाय महिन्यातून दोनदा शटडाऊन घेऊन नगर परिषद नागरिकांची फसवणूक करीत आहे. स्थानिक खासदार आज रोह्यात आले व निघून गेले, तर पालकमंत्री निवडणुकीचे कारण सांगून आल्या नाहीत. त्यांना जनतेशी काही घेणे देणे राहिले नाही. त्यामुळे रोह्यातील जनतेने न घाबरता पाण्यासाठी रस्त्यावर उतरले पाहिजे.**

**-संजय कोनकर, माजी नगराध्यक्ष, रोहा**

## विविध ठिकाणी दत्त जयंती उत्साहात

**रेवदंडा : प्रतिनिधी**

श्रीदत्त जयंतीनिमित्त अलिबाग तालुक्यातील चौल भोवाळे येथे यात्रा भरली असून पाठारे क्षत्रिय समाजाच्या वतीने शनिवारी (दि. १८) श्री दत्त मुखवटा पालखी सोहळा पार पाडला.

चौल ग्रामपंचायतीच्या विनंतीनुसार अलिबाग तहसीलदारांनी यात्रा व पालखी सोहळा निर्बंधात साजरा करण्याची मान्यता दिली आहे. त्यामुळे चौल भोवाळे श्रीदत्त यात्रेत फक्त फुले, नारळ, हार यांची दुकाने असून कोरोना नियमाचे पालन करून भाविक श्री दत्त दर्शन घेत होते. सकाळी पानसेवाडी थेरोडा येथील दत्तात्रेय नाईक यांच्या घरातून वाजतगाजत श्रीदत्त मुखवट्याची पालखी मिरवणूक काढण्यात आली. या वेळी भाविकांनी श्रीदत्त मुखवट्याची पूजाअर्चा करून दर्शन घेतले. प्रामुख्याने पाचकळशी माळी समाज बांधव या पालखी सोहळ्यात सहभागी झाले होते.

या पालखी सोहळ्यासाठी समाजाचे अध्यक्ष सुरेश कोटकर, उपाध्यक्ष अनंत घरत, सदानंद पडते, बलराम नाईक, अरुण म्हात्रे, प्रवीण घरत, वामन घरत, संजय कांबाळे, संजय एकनाथ घरत, नरेश म्हात्रे, विनोद घरत, मनोज घरत, सुभाष घरत, गजानन म्हात्रे, रमण घरत, सचिन घरत आदींनी विशेष परिश्रम घेतले.



(छाया : महेंद्र खैरे)



**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील श्रीदत्त मंदिरात शनिवारी दत्त जयंतीच्या निमित्ताने धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भाविकांनी तालुक्यातील दत्त मंदिरात गर्दी केली होती. नेरळ येथील गुरुदत्त मंदिरात अखंड ज्ञानयज्ञ सोहळा आयोजित करण्यात आला होता.

मागील वर्षी कोरोनामुळे मंदिरे बंद असल्याने दत्त जयंती उत्सव साजरा झाला नव्हता. कर्जत तालुक्यातील वाकस येथील श्री गणेश मंदिरात दत्त जयंती सोहळा आयोजित करण्यात आला होता. गावातील भक्तांनी या मंदिरात जाऊन श्रीदत्त मूर्तीचे दर्शन घेतले. आयोजक रोहिदास मोरे यांच्याकडून सर्व भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. नेरळ चिंचआळी येथील श्रीगुरुदत्त मंदिरात अखंड नामयज्ञ सोहळा आयोजित केला होता. तेथे भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. कर्जत शहरातील डेक्कन जिमखाना येथे श्रीदत्त मंदिरात प्रसादबुवा पाटील यांच्या माध्यमातून भजनाचे कार्यक्रम सुरू होते. कळंब येथील दत्त मंदिर हे प्रतिगाणगापूर म्हणून ओळखले जाते. त्या ठिकाणी भाविकांची गर्दी दिसून आली. ग्रामस्थांनी या मंदिरात भजनाचे कार्यक्रम सादर केले.

## चौकमधील देशमुख महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा

**चौक : रामप्रहर वृत्त**

येथील यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलनांतर्गत घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत प्रणव खोपकर याने प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांक दीक्षा जाधव हिला मिळाला, तर जान्हवी माळी आणि प्राची गावंडे यांना तृतीय क्रमांक विभागून देण्यात आला.

संस्थेच्या कार्याध्यक्षा शोभाताई देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या या वक्तृत्व स्पर्धेचे प्रास्ताविक प्राचार्य बादशहा भोमले यांनी केले. सावंत सर यांनी स्पर्धेचे नियम सांगितले. शोभाताई देशमुख यांनी स्पर्धकांना मार्गदर्शन केले. संस्थेचे सेक्रेटरी योगेंद्र शहा यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन महाविद्यालयाचे सहशिक्षक निखिलेश देशमुख यांनी केले. कनिष्ठ महाविद्यालयाच्या सहशिक्षकांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

## लसीकरण मोहिमेचा नागरिकांनी लाभ घ्यावा -मुख्याधिकारी जीवन पाटील

### मास्क न वापरणाऱ्यांवर पेण पालिकेची दंडात्मक कारवाई

**पेण : प्रतिनिधी**

ओमायक्रॉन विषाणूच्या पार्श्वभूमीवर पेण नगर परिषदेच्या वतीने विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. नगर परिषदेच्या लसीकरण मोहिमेचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी केले.

शहरात औषध फवारणी करण्याचे काम पेण नगर परिषदेने हाती घेतले आहे. जे नागरिक मास्क लावत नाही त्यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे. २ ते १५ डिसेंबर या कालावधीत विनामास्क फिरणाऱ्या नागरिकांकडून १२ हजार ५५० रुपयांची दंडवसुली करण्यात आली असल्याची माहिती मुख्याधिकारी पाटील दिली. पेण शहरात २० ते ३० डिसेंबरपर्यंत लसीकरण मोहीम राबिवण्यात येणार आहे. त्यात डोस घेणाऱ्या नागरिकांना कुपन देण्यात येणार असून लकी ड्रॉद्वारे आकर्षक भेट वस्तू देण्यात येणार आहेत, अशी माहिती मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी दिली.

**पेणमधील लसीकरण मोहीम कार्यक्रम**

| दिनांक | | स्थळ |
|---|---|---|
| २० डिसेंबर | : | न.प. शाळा, नंदीमाळ नाका, |
| २१ डिसेंबर | : | जैन समाज हॉल बाजारपेठ, |
| २२ डिसेंबर | : | डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळा, |
| | | पेण न.प. शाळा क्र. ४, |
| २३ डिसेंबर | : | गणपती मंदिर चावडी नाका, |
| २४ डिसेंबर | : | मरीआई माता मंदिर फणस डोंगरी, |
| २५ डिसेंबर | : | बुद्धविहार बालवाडी शाळा, बुद्धनगर, |
| २७ डिसेंबर | : | हनुमान मंदिर कोळीवाडा, |
| २८ डिसेंबर | : | पेण न.प. शाळा क्र. ६ रामवाडी, |
| २९ डिसेंबर | : | पेण न.प. शाळा क्र. ७ महाडिक वाडी, |
| ३० डिसेंबर | : | आगरी समाज हॉल, चिंचपाडा रोड |



(छाया : अनिस मनियार)

# राहुल टीम इंडियाच्या उपकर्णधारपदी

## द. आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी संधी




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी के. एल. राहुलकडे उपकर्णधारपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. अजिंक्य रहाणेच्या जागी रोहित शर्माला कसोटी संघाचा नवा उपकर्णधार बनवण्यात आले होते, मात्र तो आपल्या नव्या इनिंगला सुरुवात करण्यापूर्वीच मुंबईत सराव करताना दुखापतग्रस्त झाला. त्यामुळे तो कसोटी मालिकेतून बाहेर पडला. एएनआयच्या वृत्तानुसार रोहित शर्माच्या अनुपस्थितीत राहुल कसोटी मालिकेसाठी उपकर्णधार असेल.

रोहित शर्मा हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी मालिकेतून बाहेर पडला असून त्याच्या जागी प्रियांका पांचाळचा कसोटी संघात समावेश करण्यात आला आहे. भारतीय संघ तीन कसोटी आणि तीन एकदिवसीय सामन्यांसाठी १६ डिसेंबर रोजी दक्षिण आफ्रिकेत पोहचला असून आता संघाने सरावालाही सुरुवात केली आहे. या दोघांमधील पहिला कसोटी सामना २६ डिसेंबर रोजी सेंच्युरियन येथे खेळवला जाणार आहे.

**भारताचा कसोटी संघ**

विराट कोहली (कर्णधार), केएल राहुल, मयंक अग्रवाल, चेतेश्वर पुजारा, अजिंक्य रहाणे, श्रेयस अय्यर, हनुमा विहारी, ऋषभ पंत, वृद्धिमान साहा, रवीचंद्रन अश्विन, जयंत यादव, इशांत शर्मा, मोहम्मद शमी, उमेश यादव, उमेश यादव, श्रेयस अय्यर, मोहम्मद सिराज, प्रियांक पांचाळ.

## तिसऱ्या दिवसाअखेर ऑस्ट्रेलियाकडे मोठी आघाडी

**ॲडलेड : वृत्तसंस्था**

ॲशेस मालिकेतील दुसऱ्या कसोटी सामन्यातही इंग्लंडचा संघ बॅकफूटवर आहे. ऑस्ट्रेलियाने इंग्लंडचा पहिला डाव २३६ धावांत संपुष्टात आणून आपल्या दुसऱ्या डावाला सुरुवात केली. तिसऱ्या दिवसअखेर 'कांगारूं'नी २८२ धावांची आघाडी घेतली आहे.

तिसऱ्या दिवसअखेर डेव्हिड वॉर्नरच्या रूपात एक विकेट गमावून ऑस्ट्रेलिया संघाने ४५ धावा केल्या आहेत. वॉर्नर ३८ चेंडूंत एका चौकाराच्या मदतीने १३ धावांची भर घालून परतला. तिसऱ्या दिवसाचा खेळ थांबला त्या वेळी मार्कस हॅरिस २१ आणि मायकल नेसेर २ धावांवर नाबाद खेळत होते.

ॲशेस मालिकेतील दुसऱ्या कसोटीच्या तिसऱ्या दिवशी इंग्लंडने २ बाद १७ धावांवरून खेळाला सुरुवात केली, पण त्यांचा डाव २३६ धावांतच आटोपला. ऑस्ट्रेलियाकडून मिशेल स्टार्कने भेदक मारा करीत चार गड्यांना तंबूत धाडले. नॅथन लायनने त्याला तीन विकेट घेऊन उत्तम साथ दिली.

## आरोग्य प्रहर

### सांधेदुखीवर घरगुती उपाय

जसेजसे माणसाचे आयुष्य पुढे जात राहते तसे आरोग्याच्या समस्या सतावू लागतात. सध्याच्या युगात प्रत्येक दुसरा व्यक्ती कोणत्या ना कोणत्या समस्येने ग्रस्त आहे. यामागे कुठे ना कुठे आपले खाणे-पिणे, खराब लाईफस्टाईल, एक्सरसाईज न करणे अशी कारणे आहेत. हल्ली कोणीच वेळेवर खात नाही, तसेच लहान लहान गोष्टींवर लक्ष देत नाही. जसे सांधेदुखी, मात्र याच गोष्टी पुढे जाऊन मोठे रूप धारण करतात. केवळ वयोवृद्धच नव्हे तर युवा पिढीही यात अडकत चालली आहे.



वाढत्या वयासोबत आपल्याला सांध्यांच्या समस्या चालू होऊ शकतात. या सांध्यांमध्ये एक चिकट द्रवपदार्थ असतो. वाढत्या वयासोबत हा द्रवपदार्थ कमी होऊ लागतो. यामुळे सामान्यतः उठता-बसताना आणि चालताना त्रास होतो. सोबतच सांधेदुखीही चालू होते, पण जर आपण कमी वयापासूनच याची काळजी घेतली तर सांधे मजबूत ठेवता येतात.

सांधेदुधीपासून आराम मिळवण्यासाठी तुम्ही आल्याच्या तेलाचा वापर करू शकता. आल्याचा चहा प्यायल्यानेही तुम्हाला फायदा होऊ शकतो. याशिवाय तुम्ही आले गरम पाण्यात मध आणि लिंबू मिसळून पिऊ शकता. आल्यामध्ये अँटी इन्फ्लामेट्री कम्पाऊंड सूज कमी करण्याचे काम करते.

तुळशीमध्ये आढळणारे अँटी इन्फ्लामेट्री आणि अँटी स्पास्मोडिक गुण असतात. ज्यामुळे सांधेदुखीपासून आराम मिळू शकतो. यासाठी तुम्हाला दिवसातून तीन ते चार वेळा तुळशीच्या चहाचे सेवन करावे. असे केल्याने फायदा मिळतो.

सांधेदुखीचा त्रास हा मांसपेशी आणि हाडे कमजोर झाल्याने होतो. असे केल्याने तुम्ही ऊन घेऊ शकतात. कारण हा व्हिटामिन डीचा चांगला स्त्रोत आहे. असे केल्याने हाडेही मजबूत होण्यास मदत होते.

तुमच्या डाएटमध्ये अँटी ऑक्सिडंटचे प्रमाण भरपूर असले पाहिजे. यासाठी तुम्ही मासे, फळे, ऑलिव्ह ऑईल, अक्रोड, मेथीच्या दाण्यांचे सेवन, भाज्या आणि चहाचे सेवन करू शकता.

कोमट पाण्याने आंघोळ केल्याने स्नायूंना आराम मिळतो आणि सांधेदुखीपासून आराम मिळतो.

आहारामध्ये बदल आणि कमी शारीरिक हालचालींमुळे हिवाळ्यात वजन वाढू शकते. यामुळे सांधेदुखीची समस्या वाढते. वजन कमी केल्याने वेदना टाळण्यास मदत होते.



पनवेल : महापालिकेचे कामोठे येथील नगरसेवक विजय चिपळेकर यांना वाढदिवसानिमित्त शनिवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, भाजप कामोठे मंडल अध्यक्ष रवींद्र जोशी, नगरसेवक विकास घरत, युवा नेते हॅप्पी सिंग, रमेश म्हात्रे, संतोष म्हात्रे, राहुल गुंजाळ, राहुल पावा आदी उपस्थित होते.

## आयपीएलमधील लखनऊ संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी अँडी फ्लॉवर

**लखनऊ : वृत्तसंस्था**



इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल)च्या लखनऊ फ्रेंचायझीने अँडी फ्लॉवर यांची मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) परवानगीनंतर ही घोषणा करण्यात आली आहे. नव्या प्रशिक्षकाच्या घोषणेनंतर आता कायम ठेवण्यात आलेल्या खेळाडूंची लवकरच घोषणा होण्याची शक्यता आहे.

लखनऊ फ्रेंचायझीचे मालक संजीव गोयंका म्हणाले, खेळाडू आणि प्रशिक्षक म्हणून अँडीने क्रिकेटच्या इतिहासात आपली छाप सोडली आहे. आम्ही त्याच्या व्यावसायिकतेचा आदर करतो आणि आमच्या दूरदृष्टीसह कार्य करण्यास व कार्यसंघामध्ये मूल्य जोडण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत.

अँडी फ्लॉवर यांचे नाव प्रशिक्षक होण्याच्या शर्यतीत आघाडीवर होते. पंजाब किंग्जचा राजीनामा दिल्यापासून ते दोन नवीन संघांपैकी एकाचे मुख्य प्रशिक्षक होऊ शकतात, अशी अटकळ बांधली जात होती. त्यांच्याशिवाय गॅरी कर्स्टन, डॅनियल व्हिटोरी आणि आशिष नेहरा यांचीही नावे समोर येत होती, मात्र फ्लॉवर यांनी बाजी मारली.

**गौतम गंभीर मेंटॉर**

याशिवाय लखनऊने भारताचा माजी सलामीवीर गौतम गंभीरला संघाचा मार्गदर्शक (मेंटॉर) म्हणून नियुक्त केले आहे. आयपीएलमध्ये गंभीर पहिल्यांदाच एखाद्या संघात मार्गदर्शक असेल.



पनवेल : देवसागर साधक समाज (इंचगिरी संप्रदाय) संचलित शिवाजी नगर येथील श्री. स. स. बाळकृष्ण महाराज आध्यात्मिक ज्ञानमंदिरातील अखंड हरिनाम सप्ताहाची दत्त जयंती दिनी सांगता झाली. या वेळी भाविकांच्या उपस्थितीत माऊलींवर पुष्पवृष्टी करण्यात आली. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, कान्हाशेठ ठाकूर, शकुंतला ठाकूर, अर्चना ठाकूर, नगरसेविका दर्शना भोईर, सीता पाटील आदींनी तेथे जाऊन दर्शन घेतले. मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.











पनवेल : सबका मालिक एक, श्रद्धा व सबुरी असे संदेश देणाऱ्या साईबाबांच्या दर्शनासाठी नेरे येथून पालखीने शिर्डीकडे प्रस्थान केले आहे. या साईपालखीचे भोई होत भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी साईभक्तांना शुभेच्छा दिल्या. या वेळी तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील उपस्थित होते.

## जागतिक सर्वाधिक पसंतीच्या खेळाडूंमध्ये सचिन तिसऱ्या स्थानी

**मुंबई : प्रतिनिधी**

इंटरनेट आधारित मार्केट रिसर्च आणि डेटा ॲनालिसिस यूगव्हने केलेल्या सर्वेक्षणात भारताचा महान फलंदाज सचिन तेंडुलकर जगातील सर्वाधिक पसंतीच्या खेळाडूंमध्ये तिसऱ्या स्थानावर आहे.

मँचेस्टर युनायटेड आणि पोर्तुगालचा फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डो पहिल्या स्थानावर आहेत. त्याच वेळी, दुसऱ्या स्थानावर पॅरिस सेंट-जर्मेन आणि अर्जेंटिनाचा स्टार स्ट्रायकर लिओनेल मेस्सी आहे. जगातील सर्वाधिक पसंतीच्या पुरुषांच्या यादीत सचिन १२व्या क्रमांकावर आहे, तर खेळाडूंमध्ये तो तिसऱ्या क्रमांकावर आहे. त्याचबरोबर या यादीत रोनाल्डो चौथ्या, तर मेस्सी सातव्या क्रमांकावर आहे.

पुरुषांच्या यादीत सचिन तेंडुलकर हा अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि बॉलीवूड स्टार शाहरूख खान आणि अमिताभ बच्चन यांच्यापेक्षा पुढे आहे. त्याच वेळी सचिनने विराट कोहली आणि महेंद्रसिंह धोनीलाही मागे टाकले. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा सर्वाधिक पसंतीच्या पुरुषांच्या यादीत पहिल्या क्रमांकावर आहेत. बिल गेट्स दुसऱ्या, तर चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग तिसऱ्या क्रमांकावर आहेत.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com